विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २०११ |
| वर्ष | : | बारावे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४४ पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०११**

**गणपत्रिका क्रमांक : १६८**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष बारावे / अंक ८ / ऑगस्ट २०११

## संपादकीय

## अण्णा हजारेंची चळवळ, गांधीवाद आणि लोकशाही

इंग्रजांचा वसाहतवाद संपल्याला नुकतीच ६४ वर्षे पूर्ण झाली. या अर्ध्याहून आधिक शतकात जगात अनेक परिवर्तने, स्थित्यंतरे झाली. अनेक नवीन देश निर्माण झाले तर जुन्या महासत्तांचे विघटन झाले; या कालावधीतील दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे शीत युद्धाची समाप्ती आणि साम्यवादाचे पतन. चंद्रावरील माणसाचे पहिले पाऊल, नलिका बालिकेचा जन्म व त्या तंत्रज्ञानाचा विकास, मानवी जनुकाच्या नकाशाची मांडणी, दूरसंपर्क माध्यमे व दळणवळणात झालेली क्रांती या सगळ्या जशा जमेच्या बाजू आहेत, त्याप्रमाणेच बदललेल्या जीवनशैलीमुळे निर्माण झालेले प्रश्न, म्हणजे उद्ध्वस्त कुटुंबसंस्था, त्याचाच एक परिणाम म्हणजे तरुण पिढीत आलेले नैराश्य, दिशाहीनता, त्यातून निर्माण झालेली व्यसनाधीनता यांमुळे वैयक्तिक, सामाजिक स्वास्थ्य हे बेरजेपेक्षा वजाबाकीकडे झुकणारे आहे. जुने संसर्गजन्य रोग कमी झाले, काही नष्ट झाले तर जीवन शैलीशी निगडित असलेल्या अनेक भयानक रोगांनी मानवाला ग्रस्त केले.

या सगळ्या पार्श्वभूमीवर एक अतिशय महत्त्वाचे सामाजिक स्थित्यंतरही होत होते व ते म्हणजे 'धर्म' संकल्पनेवरील लोकांचा कमी होत जाणारा विश्वास. विशेषत: पाश्चात्त्य जगतामध्ये ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांचा आपल्या धर्म संकल्पनेबाबत होणारा वाढता भ्रमनिरास. अर्थातच, गेल्या काही दशकांत इस्लामी मूलतत्त्ववादाचा झालेला स्फोट आणि हिंदू धर्माचे नाही, तर हिंदूंचे झालेले आध्यात्मिक आणि नैतिक अध:पतन या गोष्टी दृष्टिआड करता येणार नाहीत. राजकीय संस्थांचे म्हणाल, तर साम्यवादाच्या पतनानंतर पाश्चात्त्य वळणाच्या लोकशाहीचा प्रभाव वाढला. अलीकडे मध्य आशियातील व आफ्रिका खंडातील इस्लामी राष्ट्रांतील परिवर्तनाची दिशाही याच लोकशाही व्यवस्थेच्या आग्रहाकरता दिसून येते. यातूनच एक असा भाबडा समज करून दिला गेला की, प्रगती हवी असेल तर ही पाश्चात्त्य पद्धतीची लोकशाही हवी. लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांकरता निर्माण केलेली व्यवस्था, असाही एक अर्थ लावण्यात येतो. हे समज नुसते भाबडे आणि स्वप्नाळूच नाहीत तर ते अव्यवहार्य आणि फसवे आहेत. संख्या बळाची एकाधीकारशाही ते लादणारे आहेत. धुंद आणि बेताल भांडवलशाही शिवाय ही व्यवस्था अस्तित्वात राहूच शकत नाही. साम्यवादात एकाधिकारशाही लौकर येते तर

(मलपृष्ठ २ वर)




वर्ष बारावे / अंक ८ / ऑगस्ट २०११

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक २ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बर्मिंगहॅमच्या थिंक टँकला भेट | – डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| २) | माहिती साक्षरता : आजची गरज; उद्याची सोय | – प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | ७ |
| ३) | नमस्कार | – श्री. यशवंत माने | ११ |
| ४) | चंदनगंध | – श्री. मोहन पाठक | १४ |
| ५) | भारतीय संस्कृतीचा मूळ पाया | – श्री. शं. बा. मठ | १७ |
| ६) | अमृतसरच्या सुवर्ण मंदिराचे दर्शन– न भूतो न भविष्यती . . . | – श्री. मा. ना. पाटील | २१ |
| ७) | भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | – श्री. यशवंत साने | २४ |
| ८) | परिसर वार्ता | – संकलित | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचार प्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- करमणुकीसाठी चालणारी असंख्य मासिके / नियतकालिके आहेत.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर<br>कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्यामंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२<br>या पत्त्यावर पाठवा ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# बर्मिंगहॅमच्या थिंक टँकला भेट


*बर्मिंगहॅमच्या थिंक टँकला दिलेल्या भेटीचे हे रोचक वर्णन – संपादक*

नोव्हेंबर २००७ ला भारतीय शिक्षकांची इंग्लंडला शैक्षणिक सहल नेण्यात आली होती. प्राच्य विद्या अभ्यास संस्था ठाणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही चौथी सहल होती. या सहलीचे यजमानपद बर्मिंगहॅम शिक्षण मंडळ यांच्याकडे होते. त्यांनी शाळाभेटी, शैक्षणिक चर्चा यांच्याबरोबरच शहरातील प्रेक्षणीय स्थळांना भेटी आयोजित केल्या होत्या. त्यातील एक होते 'थिंक टँक.' आम्ही जेव्हा कार्यक्रम पत्रिका पाहिली तेव्हा थिंक टँक (Think Tank) असे नाव वाचून जरा बुचकळ्यातच पडलो. नेमके हे ठिकाण काय असावे याचा अंदाज येईना. चौकशीअंती असे कळले की थिंक टँक नावाचे विज्ञान केंद्र बर्मिंगहॅम शहरामध्ये आहे. विज्ञान केंद्राला थिंक टँक असे नाव का दिले असावे, हा प्रश्न आमच्या मनात आल्यावाचून राहिला नाही. परंतु आमच्या कुतूहलातून आपले अज्ञान प्रगट होऊ नये म्हणून आम्ही गप्पच बसलो. बर्मिंगहॅम भेटीच्या तिसऱ्या दिवशी दुपारी आम्हांला तेथे जाता आले. शिक्षण विभागाच्या एका वाहनाने आम्हांला त्या केंद्राजवळ सोडले. केंद्राची इमारत प्रचंड आहे. जुन्या काळात बांधलेली ही इमारत असून त्याची नुकतीच डागडुजी करण्यात आली असावी असे वाटते. इमारतीच्या पुढे खूप मोठी मोकळी जागा आहे. या जागेवर वाहने उभी ठेवण्यास मनाई आहे. त्यामुळे इमारतीची भव्यता आपल्या नजरेत भरते. इमारतीचे दोन भाग पडतात. डाव्या बाजूला विज्ञान केंद्र आहे तर उजव्या बाजूला सभागृह आणि कार्यालये आहेत. तळमजल्यावर बरीच मोकळी जागा असून तेथे त्या इमारतीबद्दल व त्यातील सुविधांबद्दल माहिती दिलेली आहे. विज्ञान केंद्राचे प्रवेशद्वार पहिल्या मजल्यावर असल्याने आम्ही सरकत्या जिन्याने वर गेलो. विज्ञान केंद्राच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यापासून बाहेर पडेपर्यंतचा अनुभव खूपच ज्ञानवर्धक होता.




थिंक टँकमध्ये प्रवेश करायला तिकीट काढावे लागते. परंतु शिक्षक आणि विद्यार्थी यांना मात्र तेथे विनामूल्य प्रवेश मिळतो. आपण शिक्षक किंवा विद्यार्थी असल्याचा दाखला किंवा ओळखपत्र तेवढे प्रवेशद्वाराजवळ दाखवावे लागते. आमच्या गटात सर्वच शिक्षक होते आणि ही भेट बर्मिंगहॅम शिक्षण मंडळाने आयोजित केली होती. त्यामुळे आम्हांला विनामूल्य प्रवेश मिळाला. एवढेच नव्हे तर ठरलेल्या वेळी केंद्राच्या अधिकाऱ्याने आमचे स्वागत केले. त्यांनी सुरूवातीला केंद्राची आणि त्याच्या रचनेची माहिती दिली आणि मुक्तपणे फिरण्याची आम्हांला मुभा दिली. त्याआधी बरोबर ६ वाजता शेजारच्या सभागृहात थ्रीडी सिनेमा आहे याची माहिती द्यायला ते विसरले नाहीत. त्यांच्याकडून आम्हाला

कळले की हे विज्ञान केंद्र तीन मजल्यावर विखुरलेले आहे. तळमजला भूतकाळ, पहिला मजला वर्तमानकाळ तर दुसरा मजला भविष्यकाळाचा वेध घेतो. आम्ही सुरुवात केली ती तळमजल्यापासून. त्यासाठी आम्हांला पायऱ्यांनी खाली जावे लागले. कारण आम्ही प्रवेश केला होता पहिल्या मजल्यावर.



**औद्योगिक क्रांती**

१५/१६ व्या शतकात युरोपात औद्यागिक क्रांती घडून आली. या क्रांतीत इंग्लंड अग्रेसर होते. बर्मिंगहॅमच्या जवळपास कोळशाच्या खाणी असल्याने येथे उद्योगधंदे भरभराटीला आले. कापड गिरण्यांना लागणारी यंत्रे, सायकली घोडागाडी यांचे वेगवेगळे भाग, शेतीसाठी अवजारे बनविण्याचे कारखाने येथे विकसित झाले. या कारखान्यांच्या प्रतिकृती तळमजल्यावर ठेवलेल्या आहेत. त्यांतील अनेक इंजिने अजूनही चालू आहेत. अगदी सुरुवातीपासून आत्तापर्यंत सायकलींचा कसा विकास होत गेला याची माहिती देणारे प्रदर्शन येथे आहे. तसेच मोटर सायकलींचेदेखील प्रदर्शन येथे आहे. या सगळ्यात खुलून दिसते ते जेम्स वॅटने बनविलेले रेल्वेचे इंजिन. रेल्वे इंजिनाच्या विकासाने दळणवळणात क्रांती घडवून आणली हे सर्वज्ञात आहे. त्याचबरोबर मोटारींच्या विकासाने या क्रांतीला हातभारच लावला. बर्मिंगहॅम हे मोटार निर्मितीचे केंद्र होते. विज्ञान केंद्राच्या तळमजल्यावर अनेक प्रकारच्या मोटारी ठेवलेल्या आहेत. एखाद्या यंत्राचा कसकसा विकास होत गेला याची कल्पना आपल्याला तळमजल्यावरच्या प्रदर्शनातून येते.




**जेम्स वॅटचेइंजिन**

तळ मजल्यावरच्या वस्तू पाहून आम्ही उद्वाहनाने पहिल्या मजल्यावर आलो. आधी सांगितल्याप्रमाणे हा मजला वर्तमानकाळातील विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती दाखविण्यासाठी वापरलेला आहे. अणुबाँब, संगणक, जैवतंत्रज्ञान, प्लॅस्टिक्स, अंतरिक्ष संशोधन ही आधुनिक विज्ञानाची फळे आहेत. या सगळ्यांची माहिती आपल्याला या मजल्यावर मिळते. यांतील एकेक विषय अगदी सविस्तरपणे मांडला आहे. प्लॅस्टिक हा एक विषय उदाहरणादाखल घेऊ या. या विभागात आत गेलो की आपल्याला वेगवेगळ्या प्लॅस्टिकचे नमुने पाहायला मिळतात. हे कसे बनविले आहेत याची माहिती तर मिळतेच त्याचबरोबर त्यांचे गुणधर्म आणि त्यांचे उपयोग याची चांगली माहिती मिळते. प्लॅस्टिकचा विकास कसा झाला इथपासून तर प्लॅस्टिक व्यवसाय आता कोणत्या स्तरावर गेला आहे याची इत्थंभूत कल्पना आपल्याला हे प्रदर्शन

पाहून येते. इलेक्ट्रॉनिक यंत्रे, कार एवढेच नव्हे तर हृदयात लावायच्या पेसमेकरमध्येदेखील प्लॅस्टिकच असते, हे पाहून मन थक्क होते.




**वाइल्ड लाईफ**

पहिल्या दोन मजल्यावर आपण जे पाहतो त्याची आपल्याला थोडीतरी कल्पना असते. परंतु सर्वांत वरचा म्हणजे दुसरा मजला तर कल्पनेच्या पलीकडील गोष्टी दाखवितो. भविष्यकाळात काय होईल, याचा वेध घेण्याचा प्रयत्न या मजल्यावर केलेला आहे. मानवी शरीर, त्याचे आजार, मनोरंजनाची साधने, खाण्याचे पदार्थ, अंतरिक्ष प्रवास, जगातील प्राणी आणि वनस्पती या वेगवेगळ्या बाबतीत आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची पुसटशी कल्पना आपल्याला या प्रदर्शनातून येते. यांतील अनेक गोष्टी थक्क करणाऱ्या आहेत. एके ठिकाणी असे भाकित केलेले आहे की चंद्रावर मानव वस्ती करून राहू लागेल. पृथ्वीवरून चंद्रावर जाण्यास आणि परत येण्यास नियमित उड्डाणे असतील. चंद्रावरचे वातावरण मानवाला जगण्यासाठी योग्य केले जाईल. अशा अनेक भन्नाट कल्पना येथे मांडलेल्या आहेत. एखाद्या सायन्स फिक्शन पुस्तकाचे चित्ररूपात वर्णन आपण पाहतो आहोत असे आपल्याला वाटते. हे पाहिल्यावर प्रत्येकजण साहाजिकच विचार करू लागतो. तेथेच या केंद्राचे नाव थिंक टँक का ठेवले याचा उलगडा होतो.





तीनही मजल्यावरच्या प्रदर्शनीय वस्तू पाहून होईपर्यंत संध्याकाळचे सहा वाजायला आले होते. बाहेर काळोख पडला होता आणि केंद्र बंद करण्याची वेळ आली होती. त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे शेजारच्या सभागृहात थ्रीडी सिनेमा सुरू होण्याची वेळ झाली होती. म्हणून आम्ही थिंक टँकमधून बाहेर पडलो आणि सभागृहात शिरलो. तेथेदेखील आम्हाला विनामूल्य प्रवेश देण्यात आला. दारात दिलेले रंगीत चश्मे घेऊन आम्ही आपल्या आवडीची जागा शोधू लागलो. तेवढ्यात सभागृहात अंधार झाला म्हणून मिळेल त्या जागेवर बसलो आणि चश्मा लावून पडद्याकडे पाहू लागलो. त्याबरोबर पडद्यावरची वस्तू अगदी आपल्याजवळ असल्यासारखी भासू लागली. भूत, खेत, जंगली श्वापदे यांचा सिनेमा असता तर आमच्यातील काही मंडळींनी चक्क पळच काढला असता. परंतु तो सिनेमा होता स्पेश स्टेशनवरचा. अमेरिकेच्या नासा या अंतराळ संशोधन संस्थेने निर्माण केलेल्या या सिनेमात अमेरिका आणि रशियाच्या अंतराळवीरांनी अंतराळ स्थानकात दुरुस्त्या कशा केल्या याचे प्रत्यक्ष चित्रण दाखविले होते. गुरुत्वाकर्षणरहित अवस्थेत काम करायचे तेही कोणत्याही आधाराशिवाय हे खरोखरच कौतुकाचे काम आहे. तेवढ्या उंचीवरून माणूस पडेल की काय अशी भीती आम्हांला उगीचच वाटायची. परंतु ते अंतराळवीर शांतपणे आपले

विनोदबुद्धी नसलेला माणूस म्हणजे स्प्रिंग नसलेली गाडी. प्रत्येक खड्ड्यात धक्के खाणारी – हेन्री वॉर्ड विचर

काम करीत होते. दुरूस्तीच्या कामासाठी लागारी हत्यारे त्यांनी आपल्या पोषाखातच ठेवली होती. पोषाख देखील अगदीच वेगळा. वातावरण नाही, गुरूत्वाकर्षण नाही अशा अवस्थेत राहण्यासाठी बनविलेला हा पोषाख. हा सिनेमा पाहताना दोन तास कसे गेले ते आम्हांला कळलेच नाही. तेथून बाहेर पडल्यावर आम्ही थिंक टँक बद्दल चर्चा करीत पायी चालत हॉटेलमध्ये आलो. थिंकटँकची भेट त्यामुळे खरोखरच संस्मणीय झाली.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●



### गुजरातचे परंपरागत विणकाम

टेक्स्टाइल अँड ड्रेस ऑफ गुजरात या पुस्तकाचा सविस्तर परिचय एशियन आर्टच्या एप्रिल २०११ च्या अंकात करून देण्यात आला आहे. या पुस्तकात समकालीन गुजरातमधील लोकप्रिय अशा हाती तयार करण्यात आलेल्या वस्त्रांची सखोल व अभ्यासपूर्ण माहिती आहे. या पुस्तकाचे लेखक इल्युन्ड एडवर्डस् हे आहेत. ते युनायटेड किंग्डममधील नॉटिंगहॅम ट्रेन्ट विद्यापीठात ‘डिझाईन अँड विज्युअल कल्चर’ या विषयाचे प्राध्यापक आहेत. गुजरातमधील स्थानिक, वंश परंपरागत रीत्या वस्त्रांना रंग देणारे, त्यांचे विणकाम करणारे इ. कलाकारांची या पुस्तकात माहिती आहे.

संदर्भ : एशियन आर्ट: एप्रिल २०११
पृ. ९ (खंड १४ अंक ६)

### महत्त्वाचे प्रदर्शन

झ्युरिच मधील ‘दी ग्रेट अरिस्टस ऑफ इंडिया ११०० ते १९००’ रीटबर्ग वस्तुसंग्रहालयातील हे प्रदर्शन १ मे ते २१ ऑगस्ट या काळात लोकांसाठी उघडे आहे. यात ८०० वर्षांतील महत्त्वपूर्ण चित्रे असून ४० कलावंताची सुमारे २०० अतिशय उत्तम चित्रे प्रदर्शित करण्यात आली आहेत. असे सांगण्यात येते की, पाश्चात्त जगातील हे भारतीय चित्रकलेचा इतिहास उलगडून दाखणारे पहिलेच मोठे प्रदर्शन आहे. सप्टेंबरमध्ये हे प्रदर्शन न्यूयॉर्क येथील मेट्रोपॉलिटन वस्तुसंग्रहालयात जाणार आहे.

संदर्भ : एशियन आर्ट: एप्रिल २०११
पृ. १९ (खंड १४ अंक ६)

# माहिती साक्षरता : आजची गरज; उद्याची सोय

*माहिती साक्षरता या संकल्पनेची तोंड ओळख या लेखात करून दिली आहे – संपादक*

**प्रस्तावना**

कोणत्याही संशोधनाचा पाया माहिती हाच असतो. माहितीमध्ये एक सामर्थ्य असते आणि म्हणूनच आर्थिक, वैचारिक वगैरे सर्व पातळ्यांवरून माहितीचे संग्रहण केले जाते. अशा माहितीच्या बाबतीत चौकस असणे, साक्षर असणे, गरजेचे झाले आहे. ही माहिती विविध मार्गांनी व विविध रूपात मुबलकपणे उपलब्ध होत आहे. त्यातून नेमकी माहिती मिळवणे व ती योग्य प्रकारे वापरणे, यासाठी ज्या कौशल्याची गरज लागते, तिलाच माहिती साक्षरता असे म्हणतात.

**माहिती म्हणजे काय?**

माहितीला इंग्रजीत Information असे म्हणतात. त्यांचा अर्थ ज्ञान असा होतो. ज्ञानात रूपांतर होण्यासाठी आवश्यक असणारा घटक म्हणजे माहिती होय. हा घटक अर्थपूर्ण असला तरी विकसित नसतो. शिवाय, हा संप्रेषणयोग्य असावा लागतो. फॅबिसॉफ व डिलाय यांच्यामते, माहिती म्हणजे एक चिन्ह किंवा चिन्हांचा समुदाय, ज्यांतून काही मथितार्थ प्रगट होऊ शकतो.

मानवाच्या निरीक्षण वगैरे संकल्पना, तसेच मानवी मनातील विचार यांची निर्मिती सततचा अनुभव व अभ्यास यामुळे होत असते. त्यातून प्राप्त झालेले निष्कर्ष विशिष्ट पद्धतीने एकत्र आणून संप्रेषित केले जातात, तेव्हा त्याचे माहितीत रुपांतर होते. म्हणजेच, अनेक मुद्यांचे एकत्रीकरण करून, नोंद करून, देवाणघेवाण पद्धतीसाठी सुलभ रीतीने केलेली मांडणी, म्हणजे माहिती असे आपल्याला म्हणता येईल.

**डेटा, माहिती, ज्ञान**

माहितीची संकल्पना समजून घेताना त्याच्याशी निगडीत, परंतु अर्थदृष्ट्या पूर्णतः भिन्न अशा अन्य संकल्पनांचाही विचार करणे, आवश्यक आहे. कच्च्या नोंदी, तक्ते, आरेखने या स्वरूपांतील घटकांना डेटा म्हणतात. अशा विस्कळित स्वरूपाच्या घटकांवर तांत्रिक प्रक्रिया, तर्कसंगत संरचना व विश्लेषणात्मक मांडणी करून त्याचे माहितीत रुपांतर केले जाते. संकलित केलेल्या या माहितीला अनुभवाची जोड दिल्यास तिचे ज्ञानात रुपांत होते. म्हणजेच, माहिती हा डेटा आणि ज्ञान यांच्यातील दुवा आहे. (आकृती क्र. १ पहा.)

डेटा → प्रक्रिया → माहिती → अनुभव → ज्ञान

(आकृती क्र. १ : डेटा, माहिती, ज्ञान : परस्परसंबंध)

**साक्षरता कशाला म्हणतात?**

महितीशी असलेली जवळीक किंवा ओळख म्हणजे साक्षरता होय. साक्षरतेमुळे विशिष्ट घटकाचा दर्जा काय आहे, त्याचा अवलंब कसा करायचा, या बाबी लक्षात येतात. माहिती साक्षरता म्हणजे काय?

माहितीची जाण असणे, तिचे महत्त्व व तिची उपयुक्तता ओळखणे म्हणजे माहिती साक्षरता होय. ही एक व्यापक संकल्पना आहे. यामध्ये व्यक्ती तिला हव्या असलेल्या माहितीची गरज ओळखू शकते. तसेच माहिती शोधण्याची, तिचे मूल्यमापन करण्याची व ती परिणामकारकपणे वापरण्याची क्षमता प्राप्त करू शकते. माहितीची आपल्याला किती गरज आहे, ती गरज स्थूल

स्वरूपाची आहे की सूक्ष्म, प्रचलित आहे की भूतकालीन, याची अचूक जाण असणे, म्हणजे माहिती साक्षरता होय.

'इन्फर्मेशन इंडस्ट्री असोसिएशन' चे अध्यक्ष पॉल झुरुकाऊस्की यांनी इ.स. १९७४ मध्ये माहिती साक्षरता हा शब्दप्रयोग सर्वप्रथम वापरला. माहिती साधनांचा वापर कसा करावा, याचे प्रशिक्षण झालेली व्यक्ती माहिती साक्षर असते, असे मत त्यांनी मांडले.

### माहितीचे मूल्यमापन

माहिती साक्षरता आत्मसात करण्यासाठीचा प्राथमिक भाग म्हणजे माहिती आपल्याला जी प्रतिप्राप्त करायची आहे, तिचे सर्वप्रथम मूल्यामापन करणे. त्यासाठी पुढील निकष सांगितले आहेत.

अ) अद्ययावतता : हा एक महत्त्वाचा निकष आहे. शिळी, पुरातन व कालबाह्य माहिती दिशाभूल करते. अद्ययावत माहिती अभ्यासाला वेग देते.

आ) अचूकता : माहिती ही अचूकच हवी. संदिग्धता, विस्कळीतपणा, तसेच मोघम स्वरूप टाळावे

इ) दर्जा : आवश्यक असणाऱ्या माहितीचा दर्जा उच्च असावा व ती विश्वसनीय असावी.

ई) उपयुक्तता : माहिती किती उपयुक्त आहे, आपल्या अभ्यासाविषयाशी पुरेशी संबंधित आहे की नाही, ते पहावे.

उ) विषयविस्तार : माहिती आपल्या गरजांशी पुरेपुर जुळणारी असावी.

### माहिती साक्षरतेची गरज

सध्या माहितीचा विस्फोट झाल्यामुळे उदयास येणारे नवेनवे विषय व त्यांचे उपविषय यांतून माहिती विखुरली जात आहे. तिला आंतरशाखीय, तसेच बहुशाखीय स्वरूप प्राप्त झाले आहे. अशा वेळी माहितीच्या महाजाळ्यात आपल्या उपयोगाची नेमकी माहिती कोणती, तिची प्रतिप्रप्ति कशी करायची, ती त्वरित व अचूक कशी मिळवायची, याबाबत साक्षर असणे, आवश्यक झाले आहे. अन्यथा नको असलेल्या माहितीचा गुंता सोडवण्यातच सर्व वेळ निघून जाईल व या स्पर्धेच्या युगात आपण मागे पडू. हे सर्व टाळण्यासाठीच माहिती साक्षरतेची गरज निर्माण झाली आहे. एक उदाहरण घेऊन आपण हा मुद्दा अधिक स्पष्ट करू. समजा, आपल्या ग्रंथालय वर्गीकरण या विषयाशी संबंधित माहिती हवी आहे. संगणकावर आपण ग्रंथालय वर्गीकरण ही संज्ञा टाईप केल्यास आपल्याला ग्रंथालय हा शब्द असणारे असंख्य प्रलेख प्राप्त होतात. उदा. शालेय ग्रंथालय, डिजिटल ग्रंथालय, ग्रंथालय कर वगैरे. तसेच वर्गीकरण हा शब्द समाविष्ट असणारे अनेक प्रलेख प्राप्त होतात. उदा. वनस्पती वर्गीकरण, प्राणी वर्गीकरण वगैरे. त्यातील बहुसंख्य प्रलेखांतील माहिती आपल्या कामाची नसते. माहिती साक्षरतेचा वापर करून बुलियन ऑपरेटरच्या साहाय्याने तयार केलेले शोधविधान टाईप केले, तर मात्र अचूक माहिती प्राप्त होते.

### उपयुक्तता

माहिती साक्षरता उपयुक्त ठरण्याची काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) माहिती त्वरित व अद्ययावत मिळते.

२) हवी असलेली माहिती मिळवून ती योग्य व परिणामकारकपणे वापरता येते.

३) माहितीच्या स्त्रोताचे मूल्यमापन करता येते.

४) माहितीच्या वापराचे आर्थिक, बुद्धिसंपदा कायदा, तसेच सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्व समजते.

५) माहिती प्रतिप्राप्तीतील अडथळे दूर करता येतात.

**माहिती साक्षरता मानके**

माहिती साक्षरता शिकवणे व माहिती कौशल्याचे मूल्यमापन करणे, या उपक्रमांसाठी मार्गदर्शक अशी मानके अमेरिकेत केली गेली आहेत. त्यात 'अमेरिकन लायब्ररी असोशियन- एएलए' या संस्थेचा मोलाचा वाटा आहे. माहिती साक्षरतेची व्याख्या करणे, संकल्पना स्पष्ट करणे अशा कामांत या संस्थेचा मोलाचा वाटा आहे. माहिती साक्षरतेची व्याख्या करणे, संकल्पना स्पष्ट करणे अशा कामांत या संस्थेने भरीव योगदान दिले आहे. माहिती साक्षरतेसाठी एक मानकसमूह 'एसीआरएल' ने तयार केला असून त्यात ५ मानके, २२ क्षमता चाचण्या व ८७ अपेक्षित परिणामांचा समावेश करण्यात आला आहे. (तक्ता क्र. १ पहा.)

| तपशील | माहिती साक्षरता | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मानक | १ | २ | ३ | ४ | ५ | ५ |
| क्षमता चाचण्या | ४ | ५ | ७ | ३ | ३ | २२ |
| अपेक्षित परिणाम | १७ | २२ | २५ | १० | १३ | ८७ |

(तक्ता क्र. १ : माहिती साक्षरता मानकसमूह)

या ५ मानकांमध्ये माहिती साक्षरतेची उपयुक्तता कशी आहे व माहिती साक्षरतेच्या कोणत्या मानकाद्वारे अभ्यासकास कोणता लाभ होतो, याची थोडक्यात माहिती घेऊ या.

अ) मानक क्र. एक : माहिती साक्षर अभ्यासक आवश्यक असलेली माहिती परिणामकारक पद्धतीने व आत्मविश्वासपूर्वक मिळवतो.

आ) मानक क्र. दोन : माहिती साक्षर अभ्यासक आवश्यक असलेली माहिती परिणामकारक पद्धतीने या आत्मविश्वासपूर्वक मिळवतो.

इ) मानक क्र. तीन : माहिती साक्षर अभ्यासक उपलब्ध माहिती स्रोतांचे चिकित्सकपणे मूल्यमापन करुन. त्यातील त्याला उपयुक्त अशी माहिती त्याच्या बौद्धिक संपदेत समाविष्ट करतो.

ई) मानक क्र. चार : माहिती साक्षर अभ्यासक स्वतः एकटयाने किंवा विषयसमूहातील एक प्रतिनिधी म्हणून, एखादा हेतू सफल होण्यासाठी माहितीचा सुयोग्य उपयोग करतो.

उ) मानक क्र. पाच : माहिती साक्षर अभ्यासक माहिती वापरण्याच्या संदर्भातील आर्थिक, बौद्धिक संपदा कायदा, तसेच सामाजिक मुद्दे समजतो व तशी माहिती नैतिक, तसेच कायद्याच्या चौकटीत राहून मिळवतो.

**ग्रंथालय सेवांवर झालेला परिणाम**

माहिती साक्षरतेचा ग्रंथालय सेवांवर अधिकच परिणाम झालेला आढळतो. पारंपरिक सेवांबरोबर आधुनिक सेवांची ग्रंथालयात भर पडलेली दिसून येते. त्यासाठी संगणक हे माध्यम प्रभावी ठरू पहात आहे. अभ्यासक आपल्या माहितीच्या गरजांविषयी अत्यंत काटेकोर बनला आहे. त्यामुळे ग्रंथालय सेवांच्या खाली दिलेल्या प्रत्येक टप्प्यांवर माहिती साक्षरतेचा परिणाम झालेला दिसून येत आहे.

१) अभ्यासकांच्या गरजा जाणून घेणे.
२) त्याचा नेमका विषय कोणता, याची नोंद घेणे.
३) नको असलेला अथवा नकली साम्य दर्शवणारा विषय ओळखणे.
४) कमीतकमी पर्याय वापरून अभ्यासकाच्या गरजेच्या प्रलेखांचा शोध घेणे.
५) प्रलेख संग्रहित करुन त्यांची रचना करणे.
६) प्रलेखांचे निर्देशन करणे.
७) निवडक माहितीचे प्रसारण यासारखी सेवा देणे.
८) ग्रंथालयाचे संगणकीकरण करणे.

**समंजसपणाचे व्यवस्थापन**

कुठलाही निर्णय घेण्यासाठी माहिती ही पार्श्वभूमी तयार करते, ज्ञान हे पर्याय सुचवते. प्रत्यक्ष अंतिम निर्णय

घेण्यासाठी प्रदीर्घ अनुभव, दूरदृष्टी, अंतःप्रेरणा असे जे घटक वापरले जातात, ते समंजसपणा (Wisdom) या गटात मोडतात. समंजसपणाचे पुढील तीन पैलू आहेत.

१) यात योग्य अशी माहिती मिळवून त्यावर विशिष्ट प्रकारे विचार करण्याची प्रक्रिया केली जाते.

२) याद्वारे केलेल्या क्रिया समाजमान्य होतात.

३) समंजसपणा हा व्यक्तिगत गुण असून, तो समाधान मिळवून द्यायला मदत करतो.

माहिती साक्षरता पद्धतीच्या मदतीने विविध कार्यपद्धती शिकणे, कृती करणे व त्याचे मूल्यमापन करून त्यातून बोध घेणे, अशा संधी उपलब्ध होत आहेत. म्हणूनच, माहिती साक्षरतेच्या अनुभवाचा फायदा घेऊन समंजसपणाचे व्यवस्थापन हाती घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे, असे म्हणायला हरकत नाही. कारण, पुढील काळात माहितीवर आधारलेला समाज हा समंजस समाजात रुपांतरित होईल, असे चित्र दिसू लागले आहे.

**समारोप**

माहिती साक्षरतेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. संगणक व त्यावर आधारित सेवांमुळे त्याची उपयुक्तता वाढली आहे. त्यामुळे बऱ्याचदा संगणक साक्षरता, माहिती तंत्रज्ञान व माहिती साक्षरता या तीन संज्ञा समानार्थी समजण्यात येतात. पण संगणक साक्षरतेमुळे विशिष्ट हार्डवेअर व सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन वापरणे शक्य होते. माहिती तंत्रज्ञान प्रभुत्वामुळे संबंधित सर्वच तंत्रज्ञानाचा वापर संशोधनातील समस्यांच्या निराकरणासाठी साधन म्हणून कसा करायचा, हे समजते. माहिती साक्षरतेत माहिती शोधणे, त्यातील आशय समजणे, तसेच माहितीचे संप्रेषण किंवा विश्लेषण अशा बौद्धिक प्रक्रियांवर भर असतो. त्यामुळे, माहितीच्या विस्फोटामुळे उद्‌भवलेल्या आत्यंतिक गरजेच्या पोटी जरी माहिती साक्षरतेचा उगम झाला. तरी उद्याच्या समंजसपणाच्या व्यवस्थापनाची ती एक उत्तम सोय झाली आहे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**<u>संदर्भ सूची</u>**


१) कांबळे, तानाजी (२००५) : ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, पृ. ३४४

२) कोण्णूर, सुजाता (२००७) : ग्रंथालयशास्त्र शब्दकोश, डायमंड प्रकाशन, पृ. २०८

३) थोरात, लक्ष्मण (२००७) : ग्रंथालय माहितीशास्त्र, डायमंड प्रकाशन, पृ. ४३८

४) पाटकर, विवेक (२०१०) : ज्ञानाधारित समाजात ग्रंथालयाचे स्थान, समाज प्रबोधन पत्रिका, जाने-डिसें, पृ. १०९-११७

५) पारखी, गंगाधर र. (२००८) : ग्रंथालयशास्त्र परिचय, आ.२, युनिव्हर्सल प्रकाशन, पृ. २८४

६) फडके, द. ना. (२००७) : ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, आ.२, युनिव्हर्सल प्रकाशन, पृ. ४४०

7) Joshi Manoj K. and Sharma, Senjeev (2009): student's use of various Information source and need for Information Literacy Education in Kurukshrtra University, Library Herald, March, P. 46-59

8) Madam's Sushila (2007) : Introduction to Computers and Information System, Ed.3, Taxman Publication, P.210



**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**

ग्रंथपाल

स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,

आयरे मार्ग, दत्तनगर, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,

भ्रमणध्वनी- ९२२४७३४०३८

smathalye42@gmail.com.


●●●

# नमस्कार

*नमस्काराचे महत्त्व सांगणारा लेख – संपादक*

ओळखीची व्यक्ती समोर आली की प्रथम तिला आपण नमस्कार करतो. नमस्कार केल्यामुळे दोघांमध्ये सद्‌भावना निर्माण होते, एकदुसऱ्याबद्दल आदर निर्माण होतो तसेच त्यांच्यात आपुलकीची भावना निर्माण होते. म्हणून आपण नेहमी ओळखीच्या व्यक्तीला नमस्कार करावा. प्रथम आपण स्वतः नमस्कार करणे केव्हाही चांगले असते. दुसरी व्यक्ती केव्हा आपणास नमस्कार करते याची वाट पाहू नये. ज्या व्यक्तीमध्ये अहंकार असतो, अशी व्यक्ती स्वतः होऊन दुसऱ्यांना केव्हाही नमस्कार करीत नाही. आपल्याला पाहून न पाहिल्यासारखे करून पुढे निघून जाते. अशा व्यक्तीजवळ खूप अहंकार असतो. तिला सत्तेचा, पैशाचा किंवा एखाद्या पदाचा अहंकार असतो. तिच्याजवळ एवढा अहंकार असतो की, तिच्या संपूर्ण नसानसात अहंकारच भरलेला असतो. आपल्या रोजच्या जीवनात आपण अनेकवेळा याचा अनुभव घेत असतो. एखाद्या उच्चपदस्थ व्यक्तीच्या कार्यालयात आपण काही कामानिमित्त गेलो आणि त्यांना नमस्कार केला तर ती व्यक्ती आपणास नमस्कार न म्हणता, बोला काय काम आहे? असे म्हणते. कारण तिला तिच्याजवळ असणाऱ्या पदाचा एवढा अहंकार असतो की, आपण म्हणजे साक्षात परमेश्वरच या खुर्चीत बसलो आहे, आपल्या शिवाय येथे काहीही चालत नाही असे तिला वाटत असते. परंतु हा केवळ त्याचा भ्रम असतो. त्याच्याजवळ असलेले पद काही कालांतराने गेल्यावर तिला समाजात काहीही किंमत रहात नाही. कारण पदावर असताना तिने कोणलाही किंमत दिलेली नसते. आपल्याला चांगले मोठे पद मिळाले आहे, हाती सत्ता, संपत्ती आहे, म्हणून आपण दुसऱ्यांचे भले केले पाहिजे, त्यांचा मानसन्मान जपला पाहिजे, याचे भान व्यक्तीला त्या काळात रहात नाही. म्हणून निवृत्तीनंतर अशा व्यक्तीची समाजात नाचक्की होत असते. आपल्याजवळ असलेल्या सत्तेचा, पैशाचा किंवा पदाचा जनतेच्या भल्यासाठी उपयोग करावा यातच आपले खरे हित असते. जनतेची सेवा करून आपल्या नशिबाच्या खात्यात पुण्य जमा करण्याची हीच संधी असते. अशी संधी पुन्हा-पुन्हा मिळत नसते याचे आपण भान ठेवायला हवे.

नेहमीचा नमस्कार करणे वेगळे आणि केव्हाकेव्हाचा नमस्कार करणे वेगळे असते. या दोन्ही प्रकारच्या नमस्कारांमध्ये खूप फरक असतो. केव्हा-केव्हा नमस्कार करण्यामागे माणसाचा स्वार्थ लपलेला असतो. दुसऱ्या व्यक्तीकडून काही तरी हवे असते आशावेळी केव्हा-केव्हाचा नमस्कार केला जातो. अशा व्यक्तीपासून आपण चार हात लांबच रहायला हवे. कारण अशा प्रकारची व्यक्ती आपणांस केव्हा अडचण निर्माण करेल, हे सांगता येत नाही. ज्यावेळी ओळखीची व्यक्ती किंवा अनोळखी व्यक्ती आपणांस केव्हातरी नमस्कार करते त्यावेळी त्या व्यक्तीच्या मनात आपल्याकडून काहीतरी अपेक्षा असतात, त्यांना आपल्याकडून काहीतरी हवे असते हे लक्षात येते. केव्हातरी नमस्कार करणारी व्यक्ती एकवेळ चमत्कार दाखवल्याशिवाय रहात नाही. महत्त्वाचे म्हणजे नमस्कार कोणत्याही प्रकारचा असो. त्यामध्ये प्रेमळपणा, प्रेमभाव असावा. ज्या नमस्कारामध्ये प्रेमभाव नसतो किंवा आदरयुक्त नमस्कार नसतो असा नमस्कार स्वार्थी असतो. म्हणून नमस्कारामध्ये प्रेम असावे. प्रेमानेच सर्व जगाला

---

सामाजिक हित साधण्यासाठी स्वत:च्या इच्छा व प्रवृत्ती यावर बंधन घालण्याची प्रेरणा ज्या गुणांमुळे मिळते, ते नैतिक गुण होत.

जिंकता येते. साक्षात परमेश्वरालासुद्धा जिंकण्याची ताकद प्रेमामध्ये असते. पण प्रेम हे नि:स्वार्थ असावे एवढेच. म्हणून पृथ्वीवरील प्रत्येक सजीव प्राण्यावर आपण प्रेम केले पाहिजे. माणसाला माणसासारखे वागवले पाहिजे. प्राणिमात्रावर दया केली पाहिजे. परमेश्वर प्रप्तीसाठी आपण उपवास, नवस, जप, तप, होम इ. करीत असतो. पण त्यासाठी या सर्वांची काहीही गरज नसते. त्याऐवजी आपण नेहमी सर्वांना प्रेम दिले पाहिजे. कारण उपवास, नवस, जप, तप, होम या सर्वांचा समावेश प्रेमामध्येच होत असतो. म्हणून आपण नेहमी सर्वाना नि:स्वार्थ भावनेतून प्रेम द्यावे. हीच परमेश्वराची खरी भक्ती होय. प्रेमामध्ये कोणतीही लालसा नसावी, मानसन्मान असू नये. परमेश्वरावर आपण मनापासून प्रेम केले, तर तो नक्कीच प्राप्त होईल. म्हणून प.पू. मोरारी बापू त्यांच्या प्रवचनात नेहमी म्हणतात–

'तुम्ही दुसऱ्यावर प्रेम करा ,
परमेश्वर तुमच्यावर प्रेम करेल.'

प्रेम दुसऱ्याला देण्यासाठी प्रथम ते आपल्याजवळ असावे लागते. ज्यावेळी एखादी वस्तू आपण दुसऱ्याला देण्याचे ठरवतो त्यावेळी ती वस्तू प्रथम आपल्याजवळ असावी लागते. त्यावेळीच ती दुसऱ्यांना देता येते. तसेच आपण दुसऱ्यांना प्रेम द्यायचे म्हटले तर प्रथम ते आपल्याजवळ असावे लागते. जर आपल्याजवळच प्रेम नसेल तर दुसऱ्यांना आपण काय देणार? म्हणून प्रेमाचा साठा आपण आपल्या हृदयात करून ठेवला पाहिजे. ज्या व्यक्तीच्या हृदयात राग, लोभ, मोह, अहंकार यांचा साठा असतो त्या व्यक्तीच्या हृदयात प्रेम कसे जमा होणार? जर हृदयात प्रेमाचा साठा करायचा असेल किंवा प्रेम जमा करायचे असेल तर प्रथम हृदयातील राग, लोभ, अहंकार, सर्व काही काढून हृदय रिकामे केले पाहिजे. त्यावेळीच त्यामध्ये प्रेम जमा करता येईल. जर एखादे भांडे विशिष्ट वस्तूंनी भरलेले असेल तर त्यामध्ये पुन्हा दुसरी वस्तू आपण भरू शकत नाही. दुसरी वस्तू त्यामध्ये भरण्यासाठी प्रथम ते भांडे रिकामे करावे लागते. तसेच, आपल्या हृदयाचे असते. हृदयातील सर्व विकार काढून फेकून दिले पाहिजेत आणि त्यामध्ये केवळ प्रेमच भरले पाहिजे. पण हे करणार कसे? असा प्रश्न आपल्यासमोर उभा रहातो. हृदयामध्ये प्रेम साठवण्यासाठी प्रथम प्रेम कोठे आहे याचा शोध घ्यायला हवा. प्रेम हे पैशानी विकत घेता येत नसते तर ते मिळवावे लागते. आपल्या मनात प्रेम जागृत करण्यासाठी मन हे परमेश्वराच्या आठवणीत सदैव रमले पाहिजे. उठता बसता नेहमी परमेश्वराचाच ध्यास मनी असावा. दररोज सकाळी, सायंकाळी किंवा जमेल तसे भजन, पूजा, तप केले पाहिजे. भक्तीरूपी प्रवाह आपल्या हृदयात नेहमी सोडला असता त्या भांड्याच्या तळाला जो कचरा जमा झालेला असतो तो कचरा हळूहळू वर येऊन बाहेर निघून जातो आणि उरते केवळ शुद्ध पाणी. त्याचप्रमाणे आपल्या हृदयामध्ये साचलेला राग, लोभ, मोह, अहंकार, माया, भक्तीरूपी प्रवाहाने हळूहळू नष्ट होऊन जाईल आणि एक दिवस असा येईल की, भांड्यातील शुद्ध पाण्याप्रमाणे आपले हृदयही शुद्ध झाल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून सदैव प्रेमाचीच देवघेव केली पाहिजे.

परमपिता परमेश्वर हा प्रेमाचा सागर आहे, तो दयेचा सागर आहे. त्याची हृदयात साठवणूक करता आली पाहिजे. म्हणून आपल्याला प्रेम हवे असेल तर परमेश्वराशी आपण नाते जोडले पाहिजे. त्याशिवाय आपणास प्रेम मिळणार नाही. परमेश्वराशी नाते जोडायचे असेल तर ते गुरुशिवाय शक्य नाही. कारण परमेश्वराचे खरे ज्ञान गुरूच देत असतो. परमेश्वराची ओळख ही गुरूकडूनच होत असते. परमेश्वर दाता आहे. तो नेहमी दुसऱ्यांना देतच असतो. म्हणून आपण सर्वजण त्याच्याकडून अनेक अपेक्षा ठेवत असतो. परमेश्वर कोणावर रागावत नाही, कोणावर रुसत नाही. तो नेहमी आपणास प्रेमच देत असतो. म्हणून ब्रह्माकुमारी शिवानी म्हणतात की, आपण ज्यावेळी

परमेश्वराकडून प्रेम घेत असतो त्याचा आपल्याजवळ संग्रह करावा, संग्रह केल्यानंतर ते प्रेम इतरांना वाटावे, परमेश्वराकडून प्रेम/ज्ञान/दया प्राप्त केल्यानंतर आपण इतरांकडून त्याची अपेक्षा करी नाही. म्हणून, अशावेळी आपण फक्त प्रेम देत रहावे. थोडक्यात काय तर परमेश्वराकडून प्रेम प्राप्त करावे, प्रेमाचा स्वतःजवळ संग्रह करावा, आणि गरजूना त्याचे वाटप करावे. जीवन आणि मृत्यू यासंदर्भात प्रवचन देत असतांना स्वामी सुखबोधानंदजी महाराज यांनी अतिशय सुंदर उदाहरण देऊन प्रेमाचे महत्त्व समजावून दिले आहे, ते म्हणतात.

There is a gap between birth and death,
you should build bridge between them,
If you build it with ego,
you will lost all in life and
If you will build it with love,
you will achive all in life,
But, you decide how to build it.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड,
कुंभारखान पाडा, डोंबिवली (प.), जि. ठाणे
भ्रमणध्वनी - ९९३०१४८४४६

●●●

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

## अनुतारित प्रश्न

- मातेच्या उदरात जन्म घेणारे बाळ नकली औषधांमुळे सुरक्षित आहे का ?
- कचऱ्यातील प्लास्टिक व इतर घनकचऱ्यामुळे गाई - गुरांचे जीवन सुरक्षित आहे का?
- अतोनात जंगल तोडीमुळे पशुपक्ष्यांना निवारा आहे का?
- स्वाईन फ्लू, मलेरिया, क्षय रोग यांपासून मानवी जीवन मुक्त आहे का?
- विनाशकारी प्रकल्पांच्या विळख्यातून सुटका होऊ शकते का?
- येणाऱ्या नव्या पिढीने चालवलेला संगणकाचा अतिरिक्त वापर टाळता येऊ शकतो का?
- वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता अपघात टळू शकतात का?
- वृद्धाश्रमांची वाढती संख्या लक्षात घेता, आपल्याच घरात भविष्यात आपल्याला स्थान मिळेल का?
- अवेळी पडणारा पाऊस, निसर्गाचे बदलते चक्र थांबवणे आपल्या हातात आहे का?
- यज्ञ, कर्मकांड यांतून खरोखरच शांती लाभेल का?
- या सर्व समस्यांचा विचार करता, मानसिक स्वास्थ टिकू शकेल का?
- आपल्या देशाच्या मातीतून अशी अनेक प्रज्वलंत चरित्रे प्रसवली आहेत व त्यांच्या उत्तुंग जीवनांचा आधार आलेख पाहून देशाचा नागरिक होण्याचा अभिमान वाटावा. ज्या देशात अत्युच्च कोटीचे तत्त्वज्ञान निपजले आहे त्या भूमीतील माणसे रडकी का? इतकी लाचार का? आणि का? ... असंख्य प्रश्न! पण का???

- संग्रहातून


स्वाध्याय हे ज्ञानसंचयाचे व आत्मविकासाचे सर्वोत्तम साधन होय. - महात्मा गांधी

पुस्तक परिचय

# चंदनगंध

*श्री. बाबासाहेब पुरंदरे यांच्या जीवनकार्याला सलाम करणारा चंदनगंध हा गौरव ग्रंथ या ग्रंथाचा परिचय करून देणारा हा लेख – संपादक*

शिवचरित्र, त्याविषयीचे लेखन, प्रसार आणि अभ्यास यांना आपले जीवनसर्वस्व वाहून टाकणारा बाबासाहेब पुरंदरे नामक शिवशाहीर, अद्वितीय संशोधक या वेडाने झपाटणाऱ्या मराठी मातीतच घडू शकतो हे आपण जाणतोच. श्री. बाबासाहेब पुरंदरे हे अंतर्बाह्य शिवाजीमय आहेत. बाबासाहेबांनी चरित्र्य व्याख्याने, नाट्य अशा सर्व माध्यंमातून शिवाजी महाराजांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व मराठी घराघरांमध्ये नेले. एक प्रेरक शक्ती या सूत्रान्वये बाबासाहेबांनी शिवचरित्रे लिहिली. अशा बाबासाहेबांच्या अव्याहत प्रयत्नांना 'खारीचा वाटा' या भावनेने हातभार लावणाऱ्या असंख्य शिवप्रेमी संस्था आणि व्यक्ती महाराष्ट्रामध्ये आहेत. त्या सर्वांना बाबासाहेबांच्या अफाट कार्यपद्धतीने झपाटले आहे.




अशांपैकी काही जणांचे बाबासाहेबांच्या कार्य कर्तृत्वाला शब्दांच्या माध्यमातून सलाम करणारे लेखन गोळा करायचे, त्याचे संपादन संकलन करून ग्रंथरूपाने बाबासाहेबांचा गौरव 'अक्षर' करायचा हे शिवधनुष्य पेलण्यासारखे काम आहे. श्री. अरुण मणेरीकर, श्री. मयुरेश राऊत, श्री. अजितराव आपटे आणि दुर्गप्रेमी, श्री. अरुण ठाकूर यांच्या 'श्री शक्ती' शिवराज्याभिषेक समारोह समितीने हे काम एक अतिशय महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ काढून सिद्ध केले आहे. त्याबद्दल या समितीचे करावे तेवढे अभिनंदन थोडे आहे. बाबासाहेब पुरंदऱ्यांचा सहवास लाभलेली असंख्य माणसे त्याचे मार्गदर्शन लाभलेल्या असंख्य संस्थांचे कार्यकर्ते यांचे वेळोवेळी प्रसिद्ध झालेले लेखन या गौरव ग्रंथाच्या निमित्ताने एकत्रितपणे उपलब्ध झाले आहे. शिवाजी महाराजांच्या आणि एकूणच इतिहासाच्या संदर्भात या लेखनाचा संशोधन सामग्री म्हणून चांगला उपयोग होऊ शकतो.

बाबासाहेब पुरंदरे यांना त्यांच्या वयाची साठी पूर्ण केल्याच्या निमित्ताने लिहिलेल्या पत्रात विख्यात मराठी साहित्यिक पु.ल.देशपांडे लिहितात. ''सूर्य उगवल्यापासून मावळेपर्यंतचा काळ म्हणजे दिवस ... दिवस उगवा-मावळायला आपल्याला काहीच करावे लागत नाही; पण दिवसाची सार्थकता माणूस आपल्या कार्याने करीत असतो आणि त्यासाठी माणसाच्या जीवनात स्वार्थाच्या कुंपणापलीकडे वावरायला लावणारं प्रयोजन लाभावं लागतं. असं भान हरपून पाडण्यासारख उदात्त प्रयोजन लाभणं हेच खरं भाग्य'' (पृष्ठ १२) बाबासाहेबांचे जीवनध्येय असे उदात्त असल्याने शिवाजी महाराजांची पावले जिथे पडली तिथे डोंगर दऱ्या तुडवीत बाबासाहेबांनी या ध्येयासाठी आयुष्य झिजवलं. महाराज शिवछत्रपती प्रतिष्ठानासह महाराष्ट्रातील असंख्य सामाजिक शैक्षणिक

संस्थांना बाबासाहेबांनी उदार अंतःकरणाने मदत केली (पृष्ठ ४९) वेडी माणस इतिहास घडवतात तो असा. त्यामुळेच जाणता राजाचे ८५० हून अधिक प्रयोग महाराष्ट्रात झाले. असंख्य कलावंत, घोडे, हत्ती, यांच्यासह या महानाट्यातून शिवकाल उभा करणे हाही अलीकडच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील चमत्कार घडला, तो बाबासाहेबांच्या प्रेरणेनेच.

'चंदनगंध' या ग्रंथात अनेक लहान मोठ्या व्यक्तींनी बाबासाहेबांबद्दलच्या त्यांच्या अनुभवांना शब्दरूप दिले आहे. कॉलिडोस्कोप पहाताना क्षणोक्षणी बदलणारी चित्र आपल्याला अवाक करतात. तळेकर यांनी त्यांच्या अनुभवकथनात म्हटले आहे, लहान असो वा थोर अज्ञानी असो वा ज्ञानी बाबासाहेबांनी इतिहास सांगता ना मुठी सदैव उघड्या ठेवल्या म्हणून इतिहास पुढे सरकला व आपल्यापर्यंत पोहोचला.'' त्यांचे हे निरीक्षण शब्दशः खरे आहे. रक्तातलं शिवछत्रपतींचे प्रेम कागदावर उतरवणाऱ्या राजा शिवछत्रपती या महाचरित्राची पार्श्वभूमी पृष्ठ ११० ते ११८ या दरम्यान आली आहे. त्यात कवी गुरुजींनी बाबासाहेबांना जे सांगितलं 'महाराष्ट्राला एक दागिना मिळेल, (पृष्ठ ११८) ते आज अक्षरशः खरे ठरले आहे. बाबासाहेबांच्या ७५व्या निमित्ताने बोलताना प्रा. मुरलीधर सायनेकर म्हणाले होते. 'ध्यास व अभ्यास या दोन पंखांवर आरूढ होऊन बाबासाहेबांनी महाराष्ट्राचे मनोविज्ञान काबीज केले आहे.' (पृष्ठ १२४) हे यातील प्रत्येक लेखातील विचार वाचल्यानंतर पटणारे सत्य आहे.

'शिवचरित्राचे हे खंड साऱ्या महाराष्ट्राने अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचत सुटावे, या शब्दांत आचार्य प्र. के. अत्रे यांनी या चरित्र ग्रंथाची प्रशंसा केली आहे. या ग्रंथावर अत्र्यांसारखा संपादक संपूर्ण संपादकीय लिहितो, यासारखे भाग्य ते कोणते? हे शिवचरित्र महाराष्ट्र रसात लिहिले आहे असा बाबासाहेबांचा गौरव करून अत्रे पुढे लिहितात, ''यापुढे मराठी भाषेत शिवचरित्र कोणी सांगू नये आणि शिवचरित्र कोणी लिहू नये एवढी कथनाच्या आणि लेखनाच्या पराक्रमाची परीसीमा या महाकवीने करून ठेवली आहे.'' (पृ. ११)

गौरवग्रंथात राजमाता सुमित्राराजे भोसले, कमल गोखले, प्र. के. अत्रे, पु.ल. देशपांडे, डॉ. पूर्णपात्रे, ना. स. इनामदार, गो. नी. दांडेकर यांच्यासह अनेक लेखकांचे लेखन एकत्रित करण्यात आले आहे. श्री. अजितराव आपटे यांच्या लेखात बाबासाहेबांनी १२०० हून अधिक व्याख्याने, अनेक पुस्तके, अंबेगाव येथील शिवसृष्टी, जाणता राजाचे देश परदेशातील प्रयोग या बाबतची माहिती आली आहे.

छायाचित्राशिवाय हा गौरवग्रंथ अपुरा ठरला असता. बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक क्षणांपासून ते आदिशक्ती, तुळजाभवानी, भवानी तलवार बाबासाहेबांचे हस्ताक्षर, महानाट्य जाणता राजा, ही व बापूसाहेब गणंपुलेंनी काढलेली छायाचित्रे हा ग्रंथ समृद्ध करतात. या गौरव ग्रंथाचे मुखपृष्ठ (श्री. अरुण ठाकूर) हा खरे तर स्वतंत्र लेखाचा विषय आहे. जाळी पडलेल्या पिंपळ पानाच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेले बाबासाहेबांचे हसतमुख छायाचित्र बराच अर्थ सूचित करते. इतिहास संशोधनात व्यतीत केलेले जीवन या महान शिवशाहीराच्या कार्याचे प्रतीक या पिंपळ पानातून उभे केले आहे. याबरोबरच पृष्ठ १४७ वर बाबासाहेबांनी १९७४ साली काढलेले रेखाचित्रही बाबासाहेबांच्या वेगळ्या पैलूवर प्रकाश टाकते.

या सर्वांग सुंदर ग्रंथात राहून गेलेल्या एक दोन त्रुटींचा उल्लेख करणे मात्र आवश्यक आहे. त्यांतील एक म्हणजे अनुक्रमणिकेत दिलेल्या शीर्षकापुढे संबंधित लेखकांची नावे हवी होती तसेच ग्रंथाच्या शेवटी व्यक्तिनिर्देश सूची असती तर अभ्यासकांची सोय झाली असती.

महाराष्ट्रातील ग्रंथ वितरण व्यवस्थेचे दुर्दैव म्हणजे असे अनेक ग्रंथ वाचकांपर्यंत पोहोचवण्यास असमर्थ असणारे

ग्रंथ वितरक आणि व्यवस्था. महाराष्ट्रातील सर्व लहान मोठ्या ग्रंथालयांना अशा पुस्तकाचे मोल समजत नाही. जाहिराती करून 'मला पहा फुले वहा' असे ग्रंथ गाजवत ठेवले जातात. पण या गौरवग्रंथासारखे अनेक उत्तम ग्रंथ उपेक्षेचा शाप घेऊन जन्माला येतात. संबंधितांनी या गोष्टीकडे लक्ष देऊन हा ग्रंथ सर्वसामान्यांपर्यंत जाईल याची काळजी घ्यावी, असे नोंदवावेसे वाटते.

* चंदनगंध – बाबासाहेब पुरंदरे गौरव ग्रंथ
* मणेरीकर, अरुण व इतर – संक / संपादक 'ठाणे',
''श्री शक्ती'' शिवराज्याभिषेक समारोह समिती, २०१०
* मूल्य रु. १५०
पृ. १४९

**– मोहन पाठक, ठाणे**

| | |
|---|---|
| कसेबसे रडत जगण्यापेक्षा | – आनंदाने जगा. |
| नुसतं बघण्यापेक्षा | – निरीक्षण करा |
| कीव करण्यापेक्षा | – सहानुभूती द्या. |
| नुसतं ऐकण्यापेक्षा | – श्रवण करा. |
| नुसतं वाचण्यापेक्षा | – मनन करा. |
| नुसतं रोप लावण्यापेक्षा | – ते जगवा. |
| भांडण, द्वेष करण्यापेक्षा | – सुख पसरवा. |
| स्पर्श करण्यापेक्षा | – भावना अनुभवा. |
| नुसतं जाणलं असं दाखवण्यापेक्षा | – अंतर्मुख व्हा. |

– संग्रहातून

---

विचारांवर लक्ष ठेवा : त्यांचेच बनतात शब्द
शब्दांना धरून ठेवा : उगम असतो त्यांत कृतींचा
कृतींवर अंकुश ठेवा : त्याच्याच होतात सवयी
सवयींवर देखरेख ठेवा : त्यांतून घडते व्यक्तिमत्त्व
व्यक्तिमत्त्वाला वळण द्या : तेच असते तुमचे विधिलिखित!

– संग्रहातून

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावंस ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

---

तत्त्वज्ञानावरची दहा पुस्तके लिहिणे सोपे असते; पण एखाद्या तत्त्वाचे प्रत्यक्ष आचरण सतत मनोभावे करणे, ही सोपी गोष्ट नाही.

# भारतीय संस्कृतीचा मूळ पाया

(लेखांक दुसरा)

*श्री. शंकरराव मठ यांच्या भारतीय संस्कृतीच्या मुळाबद्दल ऊहापोह करणाऱ्या लेखमालेतील हा दुसरा लेख आहे.*

**भारतीय संस्कृती :**

आमच्या अस्तित्वाचे सत्य आत्मा आहे. आमचे जीवन हे आत्म्याचा विकास व वाढ या स्वरूपाचे आहे असे भारतीय संस्कृती मानते. आमच्या संस्कृतीने या शाश्वताला ईश्वर, नित्य, सत्य, अशी नावे दिली आहेत. या अस्तित्वाच्या प्रकृतीतील आत्मा मानव आहे असे आमची संस्कृती मानते. मानवाचे सामान्य अज्ञानग्रस्त प्राकृतिक अस्तित्व विकास क्रमाने प्रकाशपूर्ण दिव्य प्रकृतीत रूपांतरित व्हावे हे भारतीय विचाराच्या दृष्टीने जीवनाचे प्रयोजन आहे. मानवी अस्तित्वाचे साध्य आहे.

संस्कृतीची प्रारंभिक अवस्था ही वैदिक अवस्था होय. त्यावेळी धर्माची बाह्य औपचारिक बैठक विश्वातील ईश्वराकडे पाहण्याची भौतिक मनाची स्वाभाविक प्रवृत्ती तीवर आधारलेली होती. देवा करता 'होम' केला जात होता. दीक्षेने संस्कारित असलेले साधकच होमाग्नीच्या मागे असलेल्या आध्यात्मिक सत्याचे राखणदार होते.

भारतीय संस्कृतीची दुसरी अवस्था म्हणजे पौराणिक, तान्मिक अवस्था होय. यावेळी धर्माची बाह्य औपचारिक बैठक विश्वातील ईश्वराकडे पाहण्याची मानवाच्या आंतरिक मनाची व जीवनाची जी सखोल प्रवृत्ती तीवर आधारलेली होती. यावेळी साधकांना दिली जाणारी दीक्षाच साधकांच्या आंतरिक सत्याचा मार्ग खुला करी. व आंतरिक आध्यात्मिक जीवन जगणे शक्य होई.

भारतीय संस्कृतीची तिसरी अवस्था ही तिच्या भावीकाळातील अवस्था आहे. याची तयारी फार दिवसापासून चालली आहे. या प्रेरक कल्पनेतून आध्यात्मिक आंदोलने, शक्तिमान असे नवे धर्म व साधना संभार निघाले; परंतु अद्याप या अवस्थेचा मार्ग सापडलेला नाही.

या प्रवृत्तीत दोन प्रेरणा आहेत. एक प्रेरणा ही प्रवृत्ती मनुष्य समाजाला, सर्व मानवाला अशी हाक देते की प्रत्येकाने आपल्या शक्तिनुसार सर्वश्रेष्ठ अशा प्रकाशात जीवन व्यतीत करावे. प्रत्येकाने आत्म्याच्या उन्नतिपर अशा एखाद्या सत्यावर आपले सर्व जीवन आधारित करावे. दुसरी प्रेरणा भारतीय आध्यात्मिक मनाला केव्हा केव्हा याचे उच्च दर्शन घडले आहे. मानव शाश्वताकडे चढून जाऊ शकतो त्या प्रमाणे दिव्य जीवन खाली उतरू शकते आणि प्रकृतीत बदल करून तिची दिव्य प्रकृती बनवू शकते. मानवात दिव्यता, देवत्व सुप्त स्वरूपात आहे. ही प्रकृतीत बदल करून तिची दिव्य प्रकृती बनवू शकते. मानवात दिव्यता, देवत्व सुप्त स्वरुपात आहे. ही प्रकृती दुसऱ्या प्रेरणेतील श्रेष्ठ शक्ती आहे. आध्यात्मिक विकासाची ही तिसरी पायरी येऊन पक्की झाली म्हणजे भारतीय सभ्यतेचे नियत कार्य पूर्ण झाले असे होईल. तिने आपला अंतिम शब्द घोषित केला असे होईल.

भारतीय संस्कृतीची चौकट तीन चतुष्कांनी व्याप्त आहे. ही तीन चतुष्के अशी आहेत– चार पुरुषार्थ, चार वर्ण, व चार आश्रम.

<u>पहिले चतुष्क</u> – जीवन हेतु समन्वय, प्राणिक वासना व सुखार्थ भोग (काम) वैयक्तिक व सामूहिक हितसंबंध (अर्थ) नैतिक न्याय व कायदा (धर्म) आणि आत्मिक मुक्ती (मोक्ष)

<u>दुसरे चतुष्क</u> – समाजाची चार वर्णांत विभागणी, या व्यवस्थेत सर्वांच्या सांस्कृतिक, नैतिक, आध्यात्मिक विकासाची दृष्टी होती.

सर्व निरोगी माणसांमध्ये झुंजण्याची स्वाभाविक प्रवृत्ती असते – हेलरी बेलॉक

तिसरे चतुष्क – व्यक्ती जीवनाची चार आश्रमात विभागणी – ब्रह्मचर्य, गृहस्य, वानप्रस्य, व संन्यास हे ते चार आश्रम. ही आश्रम व्यवस्था भारतीय संस्कृतीची मौलिक कामगिरी आहे. तिचे अनन्य साधारण वैशिष्ट्य आहे. संन्यासी हा समाजातीत स्वतंत्र मनुष्य असतो. वानप्रस्य हा वनात राहणारा एकान्तवासी असतो. ब्रह्मचारी हा विद्यार्थी व गृहस्थ हा घर करून राहणारा असतो.

वेद काळी व नंतरही काही काळ ही चौकट शुद्ध स्वरूपात राहिली. तदनुसार शिक्षण विशाल व उदार होत राहिले. कडक शिस्त व तडजोड यांचा समतोल राहिला. चौकटीची परिणामकारकता अनुभवास येत राहिली. पुढे ही चौकट हळूहळू मोडकळीस आली. व्यवस्था शिथिल झाली. तथापि भरभराटीच्या काळात ही सांस्कृतिक व्यवस्था टिकून होती. तिचा परिणामही जाणवत होता. कालांतराने या व्यवस्थेचे खरे स्वरूप खरे अंतरंग टिकले नाही. अवनतीच्या काळात तर ही व्यवस्था रूढीच्या रूपातच शिल्लक राहिली. मात्र सर्व जीवनाला धार्मिक व्यवहाराचे स्वरूप प्राप्त झाले होते. या धार्मिक कल्पनेचा प्रभाव प्रत्येक क्षणी व्यक्तीवर व समाजावर पडत होता. व्यक्तीचे व समाजाचे शिक्षण, त्यांचे जीवन, वातावरण, सामाजिक परिस्थिती या सर्व ठिकाणी धर्माची छाप स्पष्ट असे.

मनुष्य हा केवळ बुद्धिमान पशु नाही तर तो एक 'आत्मा' असून त्याचे ईश्वराशी आणि ईश्वरी विश्वगण शक्तीशी कायमचे नाते आहे. कायमचा संबंध आहे. आत्म्याचे अखंड अस्तित्व जन्मापाठी जन्म या स्वरुपाचे असून त्यात त्याची प्रगती होत असते. मानवी जीवन एका विकास क्रमाचे शिखर आहे. या विकास क्रमांची अखेर 'जाणीवयुक्त आत्मा' ही आहे. मानवाचे प्रत्येक कर्म भावी जन्मात फळ देणारे असते.

भारतीय धर्माचे वैशिष्ट्य समजावून घेताना अधिकार ही प्राचीन कल्पना ध्यानात घेणे आवश्यक आहे. सश्रद्ध व अश्रद्ध असे मानवाचे दोन वर्ग नेहमीच संभवतात. या दोन वर्गांमधली जनता म्हणजे गोंधळ व रस्सीखेच होय. असमतोलपणा आणि अनिश्चितता हेच चित्र अनुभवाला येते.

**सर्वच ईश्वरमय :**

भारतीय मनाच्या दृष्टीने सर्वच प्राणी ईश्वराचे अंश आहेत. विकासशील आत्मे आहेत. अंतिम मोक्ष ह्या सर्व आत्म्याला विश्वात्म्यात प्रवेश मिळावयाचा अशी व्यवस्था आहे. सर्वांच्या मध्ये चांगुलपणा असतो. सर्वांच्या मधे देवत्व असते. ते जाणीवयुक्त झाले तर सर्वांनाच त्यांच्यामधील उच्चतम आत्म्याची हाक येते आणि या हाकेनुसार सर्वच शाश्वततेकडे, ईश्वराकडे ओढले जातात. आध्यात्माची हाक किंवा धर्माचा प्रभाव कोणावर किती परिणाम करू शकतो, याचा पडताळा पाहून मानवाचे तीन प्रकार किंवा तीन अवस्था कल्पिल्या जातात.

पहिला प्रकार – प्राणिक भौतिक वासनांच्या मानवांचा हे मानव असंस्कृत, बहिर्मुख वृत्तीचे असमतोल प्रकृतीचे असतात. त्यांच्या अज्ञानाकडे बघून लक्ष्यरुप योजनांनी त्यांना उन्नतीच्या मार्गाने न्यावे लागते.

दुसरा प्रकार – आधिक विकसित मानव– यांना आधिक खोल मानसिक, आत्मिक अनुभव घेता येतो. यांची मानवता परिपूर्णच असते. सौंदर्यवादी प्रवृत्ती विशाल असते. त्यांची नैतिक शक्ती जोरदार असते. यांची प्राणिक प्रवृत्ती विशाल असते. यांची बुद्धी जाणीव पुरसर काम करणारी असते.

तिसरा प्रकार – पूर्ण परिपक्व, पूर्ण विकसित मानव– हे मानव आध्यात्मिक उच्चस्थानी जाण्याच्या पात्रतेचे असतात. ईश्वराविषयीचे व स्वत:विषयीचे उच्चतम अंतिम सत्य प्राप्त करून घेण्याच्या क्षमतेचे असतात. दिव्य अनुभवाच्या शिखरावर जाण्याच्या योग्यतेचे असतात.

**सूचक संस्कार :**

पहिल्या प्रकारच्या मानवासाठी भारतीय धर्माने सूचक संस्कार विधी व तदनुरुप आकर्षक प्रतीके निर्माण केली

होती. वासनांची न्याय्य परिपूर्ती व्हावी म्हणून देवांना आळविण्याची शिफारस केली होती. (न्याय – धर्माला अनुसरून) या मानवासाठीच वेदकाळी बाह्ययज्ञ विधी होता.

वदोत्तर काळी या मानवासाठी अनेक धार्मिक कर्मे व कल्पना होत्या. नित्याचे सण संस्कार रोजचे बाह्य भक्ति कर्म योजलेले होते. ही कर्मे व कल्पना मंदिरातील पूजेच्या विधिभोवती व मूर्तीभोवती गुंफलेल्या होत्या. विकसित मनाला यांतील पुष्कळ गोष्टी अज्ञानी किंवा अर्धजागृत धर्मवादाच्या वाटतील. भौतिक प्रकृतीच्या अज्ञानात गुरफटलेल्या जीवाच्या जागृतीसाठी विकासासाठी या गोष्टी आवश्यक आहेत.

दुसऱ्या प्रकारच्या मानवासाठी वरील गोष्टीपासून आरंभ होतो. याला आधिक बुद्धी असते. प्रतीकाच्या मागे भारतीय धर्माने ज्या अनेक गोष्टी ठेवल्या होत्या त्या स्पष्ट समजण्याची पात्रता या मानवात असते. मानसिक आत्मिक सत्य, बुद्धीप्रणित कल्पना, सौंदर्य सूचना, नैतिक मूल्ये इत्यादी गोष्टी प्रतीकांच्या मागे भारतीय धर्माने ठेवल्या होत्या. ही सत्ये ग्रहण करता येणाऱ्याला या मानसिक दर्शनांच्या द्वारे मनाच्या पलीकडे असलेल्या आत्म्याची सखोल सत्ये जवळ करता येतात. आत्मा आणि जीवन यांतील संबंधाच्या अडचणीशी टक्कर देण्याची शक्ती मन, इच्छा हृदय ह्या मानवांना झालेली असते. मन आणि जीवात्मा यांच्यामध्ये आध्यात्मिक जाणीव निर्माण व्हावी आणि आध्यात्मिक जीवन त्यांना जगता यावे असे शिक्षण त्यांना देता येते. हा मानव तत्त्वज्ञानात्मक मानसिक, आध्यात्मिक, नैतिक, सौंदर्य विषयक, भावना विषयक, शोधाचे व साधनेचे महान मध्यवर्ती क्षेत्र– भारतीय संस्कृतीच्या महत्त्वाच्या संपत्तीचे क्षेत्र आहे. भक्तीचे उदात्त भावमय प्रसंग, धर्माचे उच्चव्यापक कठोर आदर्श, शाश्वत अनंताच्या प्राथमिक निश्चित प्रेरणा, येथे संभवतात. या प्रेरणा मानवाला अनंताचे वेड लावून योगाचा अभ्यास करण्यास प्रवृत्त करतात.

तिसऱ्या आध्यात्मिक विकासावस्थेतील माणसासाठी या गोष्टी पुरवल्या जातात. ही अवस्था सर्वोच्च व श्रेष्ठ आहे. या अवस्थेतील मानव सर्वांत श्रेष्ठ, आध्यात्मिक ज्ञानाचा पूर्ण प्रकाश सर्व श्रेष्ठ विश्वव्यापी दिव्य प्रेम, सर्व सुंदराचे सौंदर्य, सर्व भूताशी एकतेचा उदात्ततम धर्म, विश्वव्यापी करुणा, आणि कल्याणकारी वृत्ती, पूर्ण शुद्ध आत्मा, त्याची शांती व माधुर्य, मनोमय पुरुषाला लाभणारी आध्यात्मिक समाधी, या दिव्यतम वस्तू दिव्यतेसाठी तयार झालेल्या सर्वश्रेष्ठ मानवाचा वारसा आहेत. भारतीय धर्म व योग यांचे सर्वश्रेष्ठ कार्य या दिव्यतम अवस्थेकडे मानवाला नेणे हे आहे.

**प्राचीन ऋषींचा दृष्टीकोन :**

प्राचीन ऋषी ईश्वर जाणणे हे कर्तव्य मानीत. त्या बरोबर विश्वाची व जीवनाची ओळख करून घेणे हे ही त्यांचे कर्तव्य ठरले होते. या ज्ञानाने विश्व आणि जीवन याचे आकलन करावयाचे होते. यातूनच शास्त्राची निर्मिती झाली. कोणतीही पद्धतीबद्ध शिकवण ह्याला शास्त्र ही संज्ञा प्राप्त झाली. अशा रीतीने जीवनाच्या प्रत्येक अंगाचे शास्त्र निर्मिण झाले. शास्त्र रचनेचा हेतू प्रत्येक गोष्टीची तात्विक व व्यावहारिक व्यवस्था लावण्याचा प्रयत्न होता. तपशीलवार निरीक्षण, न्यायसंगत निर्णय, पूर्ण अनुभव, अंतस्फूर्तीजन्य तर्कशुद्ध व प्रायोगिक पृथक्करण (विश्लेषण) आणि संयोग (संश्लेषण) या गोष्टीवर ही शास्त्र रचना आधारलेली होती. माणसाला जीवन सफल होईल असे ज्ञान व त्या आधारावर सुरक्षिततेने त्याला व्यवहार करता यावर हा हेतू होता.

कोणताही भारतीय धर्म विषय पहिला, तर त्यात बाह्य साधनरूप आचार असतो. त्यात आचाराचे समर्थन करणारे तत्त्वज्ञान असते. आणि त्यात योग किंवा आंतरिक आचाराची पद्धती किंवा आध्यात्मिक जीवनाची कला असते. हे सर्व असले, म्हणजेच कोणताही भारतीय धर्म पूर्ण धर्म समजला जातो.

क्षमा करणे म्हणजे आपण आपल्याला दिलेली चांगली भेट – सुझन सॉमर्स

**धर्माचे स्वरूप :**

भारतात धर्माला जो प्रचंड जिवंतपणा आहे आणि त्याला जी सुरक्षित चिरंतनता आहे त्याचे कारण भारतीय धर्माचा समजुतदारपणा व त्याचे तत्त्वज्ञानात्मक स्वरूप होय. या ज्ञानावर आधारलेला जीवनाचा अर्थ, योग्य व्यवहार, भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने धर्म गणला जात असे. आत्मिक शिक्षणाच्या योग्य कल्पनेनुसार जीवन जगणे, वस्तुविषयक व जीवनाविषयक योग्य ज्ञान मिळवणे आणि या ज्ञानानुसार कर्म करणे, म्हणजे धर्म; अशी भारतीय संस्कृतीची शिकवण होती

**चिरंतन संस्कार :**

जीवन अखंड आहे. मानव अनेक जन्म घेत दीर्घ यात्रा करीत आहे. या गोष्टीचे स्मरण करून देणारा असा हा संस्कार आहे. या भौतिक स्तराच्या पलीकडे दुसरा अतिभौतिक स्तर आहे. ईश्वर आहे याचे स्मरण करून देणारा हा संस्कार आहे. या सर्वांच्यावर जी शेवटची अवस्था आहे तेथे मानवाला पूर्ण ज्ञान, पूर्ण ऐक्य, आणि दिव्य सर्वकष अनुभूती प्राप्त होते, या गोष्टीचे स्मरण करून देणारा दर्शन घडविणारा हा संस्कार आहे.

भारतीय नीती व्यवस्था उदार बनवली गेली. सर्व प्रकारच्या सर्व स्तरातील कलाविष्कारांच्या द्वारे सौंदर्य प्रवृत्तीची तृप्ती हा भारतीय संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग होता. काव्य, नाटक, गीत, नृत्य, वादन, लहान मोठ्या सर्व कला ऋषिप्रणीत म्हणून मानल्या जात. आणि त्यांचा उपयोग आत्म्याला संस्कारित करण्यासाठी केला जात असे.

**संस्कृतिवर्धन हाच हेतू :**

कला या मूलत: सौंदर्य प्रवृत्तीच्या वृत्तीसाठी आहेत, अशी कला संबंधी न्याय्य उपपत्ती होती. या पायाभूत गोष्टीला धक्का न लावता मानवाच्या बौद्धिक, नैतिक धार्मिक विकासाठी तिचा उपयोग करून घेतला जात असे.

कलांचे उच्चतम कार्य संस्कृतीच्या आध्यात्मिक बाजूचे दर्शन घडविण्यासाठीच होते. यात संशय नाही. जीवात्मा, परमेश्वर, अध्यात्म, अनंत याच गोष्टीकडे भारतीय मन नित्य लागलेले असे आणि हे भारतीय मनाचे नित्य चिंतन वरील कलांच्या अविष्कारात सर्वत्र व्यापलेले आढळते. मानवाचे सुखप्रवण व सौंदर्यप्रवण अस्तित्व, धर्म व अधात्म यांना साहायक बनविणे होते. विश्वात्म्याकडे नेणारा एक प्रमुख दरवाजा म्हणून या अस्तित्वाचा उपयोग केला जात असे.

**संस्कृतीची व्यापकता :**

बाह्य प्राणिक जीवनाचा विचारही भारतीय संस्कृतीने आपल्या आदर्शाचे उच्च कल्पनांचे विचार या सर्व जीवनावर खंबीरपणे आणले. यासाठी सामाजिक कर्तव्य, भोग, सेवा, राज्य, राजकारण अर्थ अशी शास्त्रे या संस्कृतीने रचिली. यांचा उद्देश यश, विस्तार संपन्नता हा होता. मनुष्याचा अधिकार जितका मोठा असेल, त्याचा प्रभाव जितका दूरगामी असेल तितकी त्याजवर धर्माने वागण्याची जबाबदारी आधिक मोठी. सत्ताधारी या कायद्यावर आपली सत्ता गाजविणार नाहीत, अशी व्यवस्था केली होती.

भारतीय संस्कृतीत विकासशील मानवी आत्मा तीन पायऱ्या चढून आपलेच पूर्णत्व गाठीत असे. पाहिली पायरी – सामाजिक धर्माचे व शिस्तीचे बिनचूक पालन. दुसरी पायरी आदर्श धर्माची उदात्ततर शिस्त व अधिक स्वतंत्र आत्मसंस्करण. तिसरी पायरी धार्मिक आध्यात्मिक जीवनाची व्यापक स्वतंत्रता. विश्वात्म्याशी एकरूप होणे, सर्वभूताशी, केवळात्म्याशी व ईश्वराशी एकरुप होणे म्हणजे उच्चतम आत्मा होणे. येथे मानवाचा विकास पूर्ण होतो. मानवाच्या आत्मसंस्काराची ही शेवटची पायरी.

**– श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२. दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

नियोजन म्हणजे साधने आणि अभिलाषा यांच्यात स्वत:च्या प्रयत्नांनी मेळ घालणे, असा मेळ बसतो तेथेच समृद्धी आणि संकल्पना येते.

# अमृतसरच्या सुवर्ण मंदिराचे दर्शन - न भूतो न भविष्यती . . .

*१९४५ मध्ये जागतिक पवित्र्याचे महत्त्व असलेल्या अमृतसरच्या सुवर्ण मंदिराचे श्री. मा. ना. पाटील यांना न भूतो न भविष्याती दर्शन झाले. त्याचा वृत्तांत - संपादक*

सप्टेंबर १९३९ ते मे१९४५ - दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा काळ. मार्च १९४५ मध्ये मॅट्रीकची परिक्षा आटोपली. १९४३ ते १९४५ या तीन वर्षाच्या काळांत दादर हिंदुकॉलनीमधील एक गृहस्थ श्री. वैद्य यांची एक कन्या नाशिकला तिचे मामा श्री. दळवी सुप्रसिद्ध वकील यांचेकडे शिकायला होती. ती व मी एकाच वर्गात मॅट्रिकपर्यंत होतो. परिक्षा आटोपली आणि त्यानंतर लाहोरला जाण्याची संधी चालून आली. श्री. वैद्यांचा मोठा मुलगा लाहोरला एका मोठ्या हुद्यावर नोकरीस होता. त्याचा एक सहकारी काही कामासाठी मुंबईला आलेला होता. श्री. वैद्यांच्या सर्वांत धाकट्या शाळकरी मुलाने सुट्टीमध्ये मोठ्या भावाकडे एक महिनाभर लाहोर बघण्यासाठी यावे असा कार्यक्रम ठरला होता. माझ्या वर्ग भगिनीने मला विचारले, ''सुट्टीत तुझा काय कार्यक्रम आहे? त्यावर मी सांगितले माझा काहीही कार्यक्रम नाही. मी परीक्षेच्या निकालाची वाट पहाणार आहे व निकाल लागल्यावर कोठे तरी नोकरीला लागणार आहे. पुढे कॉलेजला जाण्याचा विचार नाही. तिने मला धाकट्या भावाबरोबर कंपनी म्हणून लाहोरला जाशील का? असा प्रश्न केला. मी म्हणालो माझ्याकडे पैसे नाहीत तर मला जाणे शक्य होणार नाही. त्यावर तिने सांगितले पैशाची काळजी करू नकोस, सगळा खर्च करू. जातोस का सांग? लाहोरला जाण्याचे ठरले. तारीखपण नक्की झालेली होती. पंजाब मेलने तिचा भाऊ व बरोबर मोठ्या भावाचा सहकारी मुंबईहून येतील त्यांना नाशिकला गाठून लाहोरला जाण्याचा कार्यक्रम पक्का ठरला. त्या काळात लांब पल्ल्यांच्या मेल / अेक्सप्रेस गाड्यांना फर्स्ट, सेकंड, इंटर व थर्ड क्लासचे डबे असत. फर्स्ट व सेकंड क्लासच्या डब्ब्यांना सर्व्हंट कॅबीन असे. त्या दोघांची तिकीटे सेकंड क्लासची व माझे सर्व्हंट केबीनचे तिकीट होते. ठरल्याप्रमाणे पंजाब मेल नाशिकहून लाहोरकडे निघाली. प्रवास एकंदर ३५ तासांचा. दोन रात्री व एक संपूर्ण दिवस.

लाहोर त्या काळी मुंबईच्या तोडीचे मोठे शहर व भारताच्या ताब्यांतील सिंध प्रांताची राजधानी होते.

पंजाब मेल रात्री ८।।-९ च्या सुमारास दिल्लीला पोहोचली. मला स्टेशनवरच्या हॉटेलमधून जेवण पाठवून वैद्यांचा मुलगा व जोडीदार जेवणासाठी हॉटेलमध्ये गेले. पुढे काय झाले ते मला पहाटे ४ वा. भटिंडा स्टेशन आले तेव्हा समजले. भटिंडा स्टेशनवर रेल्वेचा एक कर्मचारी सर्व्हंट कॅबीनमध्ये आला व माझ्या नावाने चौकशी करू लागला. त्याने मला कॅबीन मधून माझे समान घेऊन सेकंड क्लासमध्ये बसावयास सांगितले. दोन सीट रिकाम्या होत्या त्यावर बसलो. बाजूच्या सीटवर एक पॅसेंजर बसले होते. त्यांनी माझी संपूर्ण चौकशी केली. मी कुठला? लाहोरला कशासाठी चाललो? वगैरे. त्याच्या नावावर दिल्ली स्टेशनवरून तार आली होती. ते दोघे दिल्ली स्टेशनवर हॉटेलमध्ये जेवणासाठी उतरले व त्यांची गाडी चुकली. ते पॅसेंजर(आता नाव लक्षात नाही.) लाहोरलाच उतरणार होते.

पंजाब मेल सकाळी ८।।-९ च्या सुमारास लाहोर स्टेशनात आली. मी व ते पॅसेंजर सर्व समान घेऊन उतरलो. लाहोर स्टेशनाच्या बाहेर समोरच एक हॉटेल होते. तेथे मॅनेजरला भेटून त्या पॅसेंजरने माझ्या चहा नाष्टा व जेवणाची

महान कलाकार छोट्या कॅनव्हासवरही महान चित्रकारी करू शकतो -चार्ल्स वॉर्नर

व्यवस्था केली. मला हॉटेल सोडून कोठेही जावू नकोस. ते, दोघे दिल्लीहून मागच्या गाडीने दुपारी ३ वा. पर्यंत येतील व तुला घरी घेऊन जातील असे सांगून पॅसेंजर निघून गेले. माझ्यासाठी चहा नाष्टा आला. नाष्टा खूप उत्तम व भरपूर होता. हाताच्या पंजाएवढ्या मोठ्या आकारच्या ७-८ पुऱ्या व बाऊल भरून आलू मटरची भाजी आणि ग्लास भरून चहा. जेवणाची गरज पडली नाही. दुपारी ३ वाजेपर्यंत हॉटेल मध्ये बसून होतो. ते दोघे दिल्लीहून आले व आम्ही सर्व जण लाहोर मधल्या घरी गेलो.

लाहोर शहराचा मध्य भागी भर वस्तीत एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर ब्लॉकमध्ये श्री. वैद्य व त्यांचे सहकारी रहात होते. आम्ही चहा नाष्टा घरीच करीत होतो. जेवणाचे डबे खाणावळीतून येत असत. सुट्टीच्या दिवशी सर्व एकत्र लाहोरमध्ये फिरत असाच सायकल वरून फटका मारत असत. रस्त्याच्या बाजूला मोकळ्या मैदानांत राष्ट्रीय स्वंयसेवक संघाची इमारत भरलेली दिसली. १९३५ मध्ये डॉ. हेडगेवारांनी नाशिकमध्ये संघ स्थापन केला होता. त्यामुळे मला संघाचे नियम व शिस्त चांगली माहीत होती. मी मैदानांत उतरलो. सायकल बाजूला ठेऊन ध्वजाला प्रणाम केला व शाखा प्रमुखांना भेटलो. प्रार्थनेची वेळ होत आली होती. शाखा प्रमुखांनी शिट्या वाजवून सर्वांना ध्वजा समोर बोलावले. सुमारे दोनशेच्या वर स्वयंसेवक निरनिराळ्या खेळांत होते. सर्व जमल्यावर मला समोर बोलावून थोडक्यात माझी ओळख करून दिली. त्यानंतर प्रार्थना होऊन शाखा सुटली.

लाहोर भटकण्यात अशाप्रकारे १५-२० दिवस निघून गेले. एका सुट्टीच्या दिवशी अमृतसरला जाऊन सुवर्ण मंदिर पहाणे व दर्शनाचा कार्यक्रम ठरला. आम्ही चौघेजण सकाळी १० च्या सुमारास अमृतसरला पोहोचलो. मंदिराच्या प्रवेश द्वाराजवळ चपला बूट व सामान ठेवण्याची व्यवस्था होती. आत शिरल्यावर दोन्ही बाजूला हातपाय धुणे, आंघोळीसाठी स्वतंत्र्य व्यवस्था होती. मुख्य मंदिराच्या भोवती पाण्याची छोटी तळी व जाण्यायेण्यासाठी मोकळी जागा होती सर्वत्र स्वच्छता छान होती. मुख्य मंदिराच्या एका मोठ्या हॉलमध्ये शिखांचा धर्मग्रंथ ''ग्रंथ साहेबा'' मध्यभागी ठेवलेला होता. आजू बाजूला भजनांचा कार्यक्रम चाललेला होता. शीख समाजातील स्त्रिया, पुरुष व लहान मुले यांची सर्वत्र गर्दी होती. ''ग्रंथ साहेबा'' चा आकार टाईम्स ऑफ इंडिया किंवा महाराष्ट्र टाईम्स वर्तमान पत्र संपूर्ण उघडले की जेवढा मोठा होईल त्याही पेक्षा थोडा मोठा आकाराचा ग्रंथ एका लांबट टेबलावर वस्त्र घालून त्यावर उघडा ठेवला होता व त्यांचे सलग वाचन चाललेले होते. मंदिराच्या भिंती, प्रवेशद्वार, बाजूची फ्रेम खाब, मेहरपी मंदिराचा मधला घुमट बाहेरून कळस इत्यादी सर्व सोन्याने मढवलेले होते. सुवर्ण मंदिर खऱ्या अर्थाने सोन्यात मढवलेले होते. सर्व दृश्य पाहून मनाला खूप समाधान वाटले होते. बाहेरची पाण्याची तळी व भोवतालचा भाग एकदम स्वच्छ होता. मंदिरात प्रवेश केल्या केल्या डोक्यावर पांढरे रूमाल किवा फेटे, टोप्या दिसत होत्या. अनपेक्षितपणे घडलेले सुवर्ण मंदिराचे दर्शन म्हणजे एक सुवर्णयोगच होता. तेथून आम्ही बाहेर पडलो व एका उत्तम हॉटेलात जेवण घेऊन लाहोरला संध्याकाळी घरी आलो.

हा हा म्हणता एप्रिल महिना संपून मे सुरू झाला. परीक्षेच्या निकालाच्या तारखेकडे लक्ष लागले. दुसरे जागतिक महायुद्ध चालूच होते. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्या नंतर अचानक महायुद्ध संपल्याची बातमी आली. तारिख नक्की लक्षांत नाही पण १० किंवा ११ मे असावी. युद्ध संपल्याचा विजयी धमाका ३-४ दिवस चालू होता. लाहोरमध्ये सर्वत्र विजयी मिरवणुका चालू होत्या सर्व हॉटेले, मिठाईची फुकट सिनेमे दाखवीत होते. विजयी धमाका ओसरत्यावर मी नाशिकला परतीचा बेत नक्की केला. शाळकरी वैद्य थोडे दिवस रहाणार होता.

---

या जगाची एक समस्या अशी की, मूर्ख लोक ठाम आहेत आणि बुद्धिमान संभ्रमात - बर्ट्रांड रसेल

एक दिवस पंजाब मेलचे नाशिकचे तिकीट काढून मला गाडीत बसवून दिले. पंजाब मेल आग्रा कँटोनमेंट स्टेशनवर आली. डब्यातील सर्व प्रवाशांना मिलिटरीच्या शिपायांनी खाली उतरवून दुसऱ्या गाडीने जा म्हणून सांगितले. मी एकटाच असल्यामुळे भांबारुन गेलो. रडू लागलो आणि डब्याच्या दरवाजाजवळ फ्लॅटफॉर्मवर उभा राहिलो. इंग्रज सोल्जर्स डब्यांत बसण्यास आले. संपूर्ण डबा सोल्जर्सनी भरला. मी डब्याजवळ रडत उभा होतो. दोन इंग्रज सोल्जर्स माझ्याजवळ आले. माझी विचारपूस केली. मला इंग्रजी चांगले बोलता येत होते. पण त्यांचे बोलणे मला नीट कळत नव्हते. त्यांनी मला डब्यात बसवून घेतले. गाडी पुढे चालू झाली. दुसरे जागतिक महायुद्ध संपले होते त्यामुळे परदेशी सैनिक आपापल्या देशांत परत जाण्यासाठी ब्रिटीश सरकारने तातडीने योजना सुरू केली होती त्याचाच परिणाम म्हणून पंजाब मेल आग्रा कँटोनमेंटला रिकामी करून परदेशी सैनिक गाडीत भरले होते. ब्रिटीश सैनिकाबरोबर नशिबाने माझा आग्रा कँटोनमेंटपासून नाशिक पर्यंतचा प्रवास त्याच गाडीने खूप मजेत झाला. मला कोठेही खाण्यापिण्यासाठी खर्च करावा लागला नाही. चहा कॉफी नाष्टा (ब्रेड ऑमलेट) जेवण (पाव व हवा बंद डब्यातील भाजी, हे सर्व गाडींला सर्वांना मिळत होते. नाशिक स्टेशन येण्यापूर्वी मी जवळच्या सर्व ब्रिटीश सैनिकांना शेकहँड व गुड बाय करीत होतो त्यावेळी एकाने मला ५ जिवंत बुलेटस् (३०३ बंदुकीच्या गोळ्या) व दुसऱ्याने व्हिक्टोरिया राणीचा छाप असलेले एक तांब्याच्या धातूचे एक पदक भेट म्हणून दिले. मी नाशिक आल्यावर उतरलो. सर्व सैनिक देवळाली स्टेशनवर उतरणार होते. अमृतसरच्या सुवर्ण मंदिराला अनपेक्षित भेट कहाणी येथे संपवीत आहे.

**मा. ना. पाटील**
जेष्ठ सभासद, वि. प्र. मंडळ

●●●

## वेळ नाही


अमाप सुख आहे सगळ्यांच्याच
पदरात
पण ते अनुभवायला वेळ नाही
आईच्या अंगाईची जाणीव आहे
पण आईला आज आई म्हणायला
वेळ नाही
सगळ्यांची नावं मोबाईलमध्ये
सेव्ह आहेत
पण प्रेमाचे चार शब्द बोलायलाही
वेळ नाही
डोळ्यावर आली खूप झोप
पण आज कोणाकडे झोपायलाही
वेळ नाही
सांगेल कोण कशाला दुसऱ्याबद्दल
जेव्हा इथे स्वत:कडेच बघायला
वेळ नाही
परक्याची जाणीव कशी असेल
जर इथे आपल्याच माणसांसाठी
वेळ नाही
अरे जीवना, तूच सांग
जगण्यासाठी चाललेल्या या धावपळीत
जगायलाच आज वेळ का नाही????

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*भारतीय संस्कृतीतील वैदिक यज्ञ या संकल्पनेचा परिचय या लेखात आला आहे - संपादक*


**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील अंकात, 'वैदिक यज्ञ' संकल्पनेबद्दल काही मूलभूत प्रश्न मी उपस्थित केले होते. 'यज्ञाचे' सध्याचे प्रचलित बाह्य दर्शनी व "Ritualistic" म्हणजे धार्मिक विधी वा कर्मकांडी स्वरूप हे काय साध्य करते व त्याचा 'आध्यात्मिक' उद्धिष्टे वा साधनेशी काय संबंध आहे? या सर्वांचा गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. यज्ञाची आजची **विविध स्वरुपे** ही 'Spiritual Science' 'आध्यात्मिक शास्त्रांशी' किती निगडित व ध्येयनिष्ठ आहेत हे पहावे लागेल.




**यज्ञाचे मूळ स्वरुप :**

'यज्ञ' ह्या संकल्पनेचे 'बीज स्वरूप' वेद संहितामध्ये मिळेल, पण ते विस्कळीत वा तुटक पद्धतीने सांगितले गेले आहे. वा समजले गेले आहे. पण, पुरुषसूक्त (ऋग्वेदातीलच) अत्यंत महत्त्वाचे सूत्र हे 'यज्ञ संकल्पनेचा' मूळ जन्म व त्यानंतरचे त्याचे पृथ्वीवरील असलेल्या 'कार्यरत' प्रकृतीच्या परिसरांत 'क्षर पुरुषाला' 'मानवी फॉर्मला' जे विशिष्ट 'मॉडेल' असे जैविक यंत्र दिले, त्याचे विवरण आहे. अर्थातच हे अत्यंत गर्भपूर्ण व संक्षिप्त आहे व त्याचे गूढ वा रहस्य जाणण्याकरिता आवश्यक रचनेत मांडले आहे. हे सर्व मानवी बुद्धीला, शरीराला, कल्पनाशक्तीला आव्हान देणारे आहे. यांत शंका नाही!!




हे असे का? त्याचे महत्त्वाचे कारण हे की सृष्टीनिर्मिती करिता ज्या यज्ञाची योजना सृष्टिकर्त्याने योजिली तिची सर्व Operations (क्रिया) ह्या अर्धातच 'अव्यक्त' जगाच्या उंबरठ्यावर झालेल्या आहेत, कीं ज्या सृष्टी यज्ञानंतरच एका व्यक्त जगाचे वैश्विक स्वरूप जड स्वरुपांत दृश्य, अदृश्य, सूक्ष्म व इतर मिश्र चैतन्य स्वरूपांतही अवतीर्ण झाले. पण तरीही व्यक्त व अव्यक्त आणि पिंड व ब्रह्मांड, ह्याच्या एका संकल्पित नातेसंबंधावर बांधीलकीच्या करारानेच झाले!!

**''पुरुष एवेदं सर्व। यत् भूतं यच्च भव्यम्।**
**उतामृतत्वस्येशानः यदन्ने नातिरोहति।**

**भावार्थ** : आज जे निर्माण झाले आहे व पुढे भविष्यात जे होणार आहे, ते सर्व तोच आहे. इतकेच नव्हे, तर तो देवांचाही शास्ता आहे. आणि म्हणून सर्व मर्त्य अवस्थेच्या अतीत आहे.

लोकांना निवडीची संधी दिली, तर लोक शांततेची निवड करतील. - रोनाल्ड रेगन

अनुक्रमे भूत, वर्तमान व भविष्य ह्या तिन्ही काळांमध्ये जे होते, आहे व होणार आहे ते सर्व ईश्वराची एकमेव 'सत्यतत्वाची' केवळ अभिव्यक्ती असू शकते. (चिन्मयानंद)

**'पुरुष' संकल्पना ऋग्वेद सूक्त :**

बीज स्वरूपांत सगळी यज्ञ साधने जरुरी एवढी ह्या पृथ्वीवर प्रकृतीमार्फत सतत पुरवली जात आहेत. अन्न, पाणी, वनस्पती, प्राणी, एव्हढेच काय पण नियमित ऋत् व त्यांचे नियमित बदल हे विश्वोत्पन्न ग्रह, तारे, सूर्य, चंद्र ह्याच्या प्रभावाखाली ठेवले आहेत. एव्हढेच नव्हे तर, मानवी शरीरालाही एक मोठे यंत्र देहरूपात – (बुद्धी, मन, अहंकार चित्त) व नंतर ह्या सर्वांना मूळशक्ती व आधार देणारा 'प्राण' व शरीरात अनेक इंद्रिये ज्ञान कर्म अनेक यंत्रे श्वास, रक्ताभिसरण, शरीर वृद्धी, संवर्धन हे 'पुरुषाच्या 'पूर' – म्हणजे 'किल्ला' किंवा 'दुर्ग' ह्या संचलित रचनेने 'तयार अवस्थेत' दिले आहे. ह्या गूढ शरीर व आत्मा 'Embodied Consciousunss' चा केवळ 'भौतिक अभ्यासही' अजून मानव जातीने पुरा केला नाही. पण, ह्या पुरुषाला अनेक शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक क्रिया करून त्याला स्वत:च्याच अमृतत्वावर आधारलेल्या काँशसनेसची यज्ञक्रियेने संस्कृतीकरण व उर्ध्वीकरण करण्याची युक्ती व साधने दिली आहेत. सुप्त प्रेरणा दिल्या आहेत. पवित्र व उज्वल भविष्यही दिले आहे!! पण, ह्या अज्ञानी व सीमित बुद्धी असणाऱ्या जीवात्म्याला प्रगती व मुक्तीही मिळण्यासाठी ज्या प्रयत्नांची वा क्रियांची आवश्यकता आहे, ती म्हणजे 'यज्ञक्रियांची' होय. ही जाणीव उत्पन्न होणे आवश्यक आहे.

**पृथ्वीवरील भौतिक यज्ञ :**

हे अनेक 'यज्ञ'त्याच्या मानवाच्या स्वत:च्या ठिकाणी, बाह्य प्रकृतीत, समाष्टिच्या विराट स्वरूपांत, विश्वात होत आहेत व त्याची जाणीव मानवाला व्हावी, म्हणून त्याला एक प्रतीकात्मक 'यज्ञक्रिया' ऋषी मुनींच्या शिकवणीतून प्रदान झालेली आहे. त्याची इथली भौतिक स्वरूपे ही प्रकृतीला मर्यादेत व मदतीने मूळ यज्ञाच्या प्रतीकात्मक स्वरूपे होत. हा ह्या प्रयोगातून मूळ वैदिक संकल्पनेकडे जाणे आवश्यक आहे. खरा यज्ञ होय. यज्ञाची कोणती मूलतत्त्वे आहेत? हे जाणण्यासाठी कल्पना शक्तीला ताण देण्याची गरज आहे, तरच हे गूढ उकलेल.!!

दुर्दैवाने, ज्या मूळ स्वसंवेद्य शक्तीने (''सत, चित, आनंद'' परमात्मा – चिंता ब्रह्माने ह्या प्रचंड संभाराची उत्पत्ती व रचना केली त्याच्या प्रचंड सामर्थ्याची, कल्पना शक्तीची, सृजनशक्तीची, शिवाय या रचनेच्या सुप्त ध्येय व उद्दिष्टांची, सुतराम कल्पना आजही मानवजातीला नाही. परंतु अशी जाणीव व्हावी ही इच्छा प्रगटही, उद्भवतही नाही. याचे आश्चर्य वाटावे व खंतही वाटावी, ही सद्यस्थिति आहे!!

ह्या जड, सीमित शक्तीच्या इंद्रियांना जे जग दिसते त्याबद्दल अज्ञानी राहून स्वत:च्या गुण दोषांच्या व इष्ट अनिष्ट प्रवृत्तीच्या खेळांत तो मानव आपले आयुष्य व्यतीत करतो व त्या अज्ञानातच मृत्यू पावतो.

**महायोगी अरविंद यांची मदत :**



या 'यज्ञाच्या' संकल्पनेबद्दल **'बृहद्अरण्यक उपनिषदात' अश्वमेध यज्ञाचा,** म्हणजे मूळ बीज संकल्पनेचा आधार घेतला आहे. महायोगी अरविंद ह्या संकल्पनेचा (अश्वमेधाचा) खरा अर्थ लावतात व जो वेद रहस्यातील खरी आध्यात्मिकता जाणण्यासाठी किती अर्थपूर्ण, उपयोगी व आपल्या कल्पनाशक्तीचे सामर्थ्य वाढवण्यासाठी उपयोगी पडतो, ते पुढे पाहूच!!

**<u>वैश्विक यज्ञ संकल्पना कोरडे यंत्र नव्हे :</u>**

महत्त्वाची गोष्ट ही आहे की **'यज्ञ' ही काही भौतिकातील Physical म्हणजे दृश्य किंवा इंद्रियगोचर सर्वसाधारण यंत्रणा नव्हे.** इलेक्ट्रिसिटीवर चालणारा मिक्सर जसे ताकातून लोणी काढतो, ते भौतिक यंत्र नव्हे; तर विश्वाच्या अव्यक्त व व्यक्त, दोन्ही जगाच्या 'संयुक्त स्तरावर' अत्यंत गूढ 'फॉर्म्युलावर' (समीकरणावर) विश्वातील सर्व व कोणत्याही वस्तू, गुण, प्रवृत्ती, योनि, समाज, जीवन, ह्या व इतर गोष्टीमध्येही मूलभूत व चिरस्थामी परिवर्तन घडवून आणतो, असे (एक महत्त्वाचे) वैश्विक यंत्र. लक्षात घ्या की त्याच्या 'विषयात' ज्या गोष्टीचे परिवर्तन होते ते भौतिक वस्तुमान होणाऱ्या गोष्टीसारखे मर्यादित नव्हे, तर जैविक सर्व गोष्टी म्हणजे "Objective, Subjective Cosmic, Temporal".

अशा सर्व चीजा कवेत घेऊन मौलिक बदल घडवून आणते. भौतिकांत ताकातून लोणी निघते तर वैश्विक यज्ञाची काय फलश्रुती असेल?

**<u>निसर्गात अदृष्ट व अजाणता होणारे नित्य यज्ञ :</u>**

हे 'यज्ञ' निसर्गात होतच असतात - कदाचित जाणवत नाहीत. पण, मानवी जीवात्म्याला या **<u>'यज्ञ यंत्रावर'</u>** सत्ता मिळवण्याकरितां व त्याचा सदुपयोग त्याच्या आत्मिक परिवर्तनाच्या सुद्धा दिशेला विशिष्ट कार्य करण्याकरिता एक प्रतीकात्मक <u>'यज्ञक्रिया'</u> ही कर्मकांडी संस्थांनी राबवली. अर्थातच तिचा उपयोग व दिशा ही मानवी प्राकृतिक मनाच्या गुणदोषांवर ज्ञानशक्तीवर मर्यादित स्वरूपात राबवली गेली. पण, त्या क्रिया ज्या गूढ आंतरिक क्रियांची ओळख व जाणीव करून देतात, तिकडे मानवाचे पूर्ण लक्ष गेलेले नाही.

भौतिक विज्ञानात ज्या ज्ञानाची प्राप्ती होते ती **<u>'Surface level-Knowledge'</u>** म्हणजे पृष्ठाभागावरील, 'बहिर्गत ज्ञानाएवढेच' मर्यादित असते. कार्यकारणभावाचे ज्ञान हे गूढ व खोल पातळीवर, सूक्ष्म पातळीवर व आगम नातेसंबंधी समीकरणापर्यंत जातच नाही. हा 'साक्षात्कार' कधी होणार?

हे समजण्याकरिताच 'बहिर्याग' व 'अन्तर्याग' हे वर्गीकरण व ह्यांची योजना केलेली आहे. ज्या ऋषी मुनींनी ब्रह्मज्ञानी विभूतींनी, या स्वरूपांची भौतिक स्तरावर निर्मिती केली, त्यांच्या दूरदृष्टीचे व मानवी सीमित ज्ञानाच्या जाणीवेचे त्यांना असलेले ज्ञान, ह्या सर्वाचे खरोखर कौतुक करावयाला हवे. ब्रह्माच्या संकल्पनाचे 'भाषांतर' (रूपांतर) त्यांनी मानवी ज्ञानभाषेत केले - हा जो प्रयत्न केला तो अतुलनीय असा भारतीय संस्कृतीत आहे!!!

हा मुद्दा एका उदाहरणाने जास्त स्पष्ट होईल.

'केन उपनिषदात' अनेक शोधप्रश्न व उत्तरे अंतभूर्त आहेत. डोळ्यांमागील पडदा हा डोळा (Lens -दुर्बीण) एखादे देहाबाहेरील वस्तू, चित्र पहातो, असे आपण म्हणतो. पण ह्या डोळ्याला किंवा त्या पडद्याला कोण पहातो? शरीराबाहेर बाहेर मोर आहे, तर मोराचे पिसारायुक्त चित्र पडद्यावर पडल्यावर, हा मोर व त्याचे सौंदर्य व त्याचा मनोहर थाट कोण जाणतो? कुठल्या यांत्रिक समीकरणाने? त्या मोराला पाऊस पडल्यावर उत्स्फूर्त नाचावसे वाटेल, आनंद होईल व त्या आनंदाची भूमिका व भावना कोण जाणतो? कशा पद्धतीने जाणतो? म्हणूनच मनाच्या वैदिक संकल्पनेत, विज्ञान, प्रज्ञान, संज्ञान व अज्ञान ह्या कल्पना आहेत. त्या नीटपणे जाणल्या पाहिजेत.

**<u>संज्ञान संकल्पना</u>** Holistic आहे.


त्यातील, ''संज्ञानम्'' ह्या वेदिक संकल्पनेवर भाष्य करताना महायोगी अरविंद म्हणतात "That in **the insect knows anatomy of its vicfim**; that in the men outwararlly insensible not only feels and remembers the action of the Surgeon's Knief,

---

जे प्रांजळ वृत्तीचे असतात, त्यांनाच दुसऱ्यांचा प्रांजळपणा ओळखू येतो. - कार्लाईल

but knows the appropriate reactions of suffering, which were in the physical body inhibited by the anaesthetic and, therefore, non existent. . ."

"The upanishad (Ken upanished) declares that **the mind** in us is infinite, it knows not only what has been seen, but, **what has not been seen**, not only what has been heard, **but what has not been heard**, not only what has been discriminated by the thought; **but what has not been discriminated by the thought.**"(P-149-upanished)




Hologram मध्ये थोडा प्रत्यय यावा

मुंगूसाला सापाचे डोके हे खरे लक्ष कसे तत्काल वाटते व समजते. त्या तोंडातच विषाचे हत्यार असते हे उमजते? मुंगूसाला सापाच्या शरीराचे व अंतर्गत वैशिष्ट्याचे ज्ञान कोणत्या इंद्रियांनी होते का होते, कसे होते, केव्हा होते?

नारूचा जंतू गुढग्यातून का बाहेर पडतो?

ह्या प्रश्नांची उकल भौतिक विज्ञानाच्या पद्धतीत (Methodology) मध्ये व Logic, वा Scientific Temper मध्ये दिसत नाहीत, किंवा अशक्य आहे.!!

ह्याचे कारण, मानवी मनाचा Reductionist (Non-wholistic) पद्धतीने भौतिक शास्त्रे अभ्यास करतात. पण, हे विश्व, त्याची निर्मिती, त्यात पृथ्वी, ग्रह, तारे ह्यांची निर्मिती चंद्र, सूर्य ह्यांची निर्मिती व पृथ्वीवर जीवसृष्टी व मानवी सृष्टी निर्माण झाली त्या निर्मीतीच्या अवाढव्य उद्योगातच मानवी मनाला अस्तित्व आहे. हे जाणले जात नाही. ते मानवी देह, 'आत्मा' व्यष्टिसमष्टि व संबंध चराचराशी संबंधित आहे, विश्वातले हे सर्व घटक एकमेकाशी संबंधित, अवलंबून व कांही ज्ञात व काही अज्ञात अशा नातेसंबंधांनी जुडलेले आहेत. हे समजल्यावर त्या मनाच्या मर्यादा, कक्षा व अप्रकाशित सामर्थ्याचा शोध जेव्हा भारतातील वैदिक ज्ञानमार्गामध्ये आढळतो तेवढा कुठेच इतरत्र आढळत नाही.

त्या मनाच्या उत्क्रांतीच्या ७ पातळ्या चढत्या पद्धतीत मानल्या आहेत. वेदिक ज्ञान व योग साधनेने हा 'सोपान मार्ग' चढावयाचा असतो. महत्त्वाची गोष्ट ही की ह्या मनाच्या सुप्त सामर्थ्याच्या द्वारे मानवी इंद्रियांना ज्या अज्ञात जगाची ओळख नाही किंवा अव्यक्त जगांतील सृजनशील तत्व, ओळख नाही, ती, ही जाणण्याची शक्ती आहे!!

एकदा मनाच्या ह्या अव्यक्त, अप्रगट सामर्थ्याची जाणीव झाली तर 'श्रद्धाभावनेने' प्रयत्न सुरू होतात व त्या सत्य ज्ञानाची आणि विद्येची प्राप्ती होऊ शकते.

ह्या 'सिद्धांताचा' उल्लेख कराण्याचे, कारण हेच की, 'यज्ञ' ह्या वैश्विक संकल्पनेचे सामर्थ्य व त्याचा उपयोग करण्यासाठी मानवी मनाची प्राथमिक तयारी होते. पण, त्या तयारीमध्ये **विश्वास व श्रद्धा** ह्यांची आवश्यकता आहे. **'अश्वमेध यज्ञ'** हा या प्रयात्नांतील **एक मुख्य संकल्पना आहे**. इथे, प्रथम ह्या नवीन 'अश्वमेध' संकल्पनेचा खरा अर्थ प्राप्त करावयाचा असेल, तर आपले पूर्वग्रह, पूर्व ज्ञान कसेही, कोठेही प्राप्त झाले असेल तर ते बाजूला ठेवून **महात्मा नारायण स्वामी त्यांच्या 'उपनिषद रहस्यांत'** काय सांगतात ते बघू या.

**''अश्नुते व्याप्नोतीत्यवश्व''** **अशु व्याप्ती सङ्गते च।''** जो बहुत व्यापक हो उसे अश्व कहते है। पुरुषसुक्त

आदि मे अनेक जगह जगत ईश्वर के विराट रूप जगत को प्रकट करने के लिए अश्व शब्द प्रयुक्त हुआ है।

**मेध धातु के अर्थ मेधा, हिंसा और संगम के है। अश्व के अर्थ जब जगत के है, तब 'मेध्य' के अर्थ भी 'मेधा' – 'जानने के योग्य' ही किये या सकते है।**

**''अन्स्तु उपनिषद (बृहद्‌दारण्यकोपानिषद) का प्रथम 'ब्राह्मण' ईश्वर के महत्त्व प्रदर्शन और उसकी महान रचना और उसी महान सत्ता के विचार द्वारा अपने भीतर उसके जगत् का रूप विराट रूप को जानने और विचारने योग्य कहा गया है।''**

**''एक प्रसिद्ध वचन आहे.**

**वेदाहि यज्ञार्थमाभिप्रवृतः।**

**वेद निःसंदेह यज्ञ के प्रयोजन को**


**पूरा करने के लिए अभिप्रेत है।''**

**मग ह्या वेदातील यज्ञ रहस्याचा आपल्याला उलगडा व बोध का होत नाही?**

<u>संकल्पनेचा बोध</u>

महायोगी अरविंद हे या प्रश्नाला उत्तर देतात. त्यांच्या शब्दांत ते जाणू या.

"The Brihadaranyka upanishad at once the most obscure and the profoundest of the upanishads, offers - peculiar difficultices to the modern mind. . . it has preferred to couch its ideas in a highly figurative and symbolical lauguage, which to its contemporaries, accustomed to this suggestive dialect, must have seemed a noble frame for its riches, but to translate the old vedic language and figures into the form contemporary thought prefers to give to its ideas is the sole object of this (my Aurotiudo) Commentary."



Creating the sacrificial fire using arani

नंतर अरविंद म्हणतात की ह्या उपनिषदाची सुरुवात एकदम व आकस्मिक अशा उत्तेजक ''अश्वमेधाचा घोडा'' ह्या स्वरूपाने केली आहे.

'ॐ' ने सुरुवात करून नंतर ह्या अश्वाच्या यज्ञाचे डोके हे उषत्कालाचे रूप आहे, सूर्य ह्या अश्वाचा डोळा आहे, श्वास हा वायू आहे, उघडून वासलेले तोंड हा अग्नी आहे – म्हणजे वैश्विक (गूढ) शक्ती आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे– ''काळ (काल – Time) – हा त्या यज्ञीय अश्वाचा आत्मा आहे.

'स्वर्ग' ही त्याची पाठ, पोटाचा मधला भाग –
हे अंतरिक्ष आहे. तर, पृथ्वी हे त्याचे चरण आहेत. अशी वर्णने आहेत. कां बरे?

मी हे सगळे वर्णन पुढे मुद्दामच करीत नाही, कारण ते मुळात वाचल्यावर जे डोके गरगरायला लागते, व हे अनेक विद्वानांचे झाल्यावर मूकपणे त्यांनी याचा अर्थ लावण्याचे प्रयत्न सोडून दिले किंवा अत्यंत दिशाहीन, बोधहीन भौतिक, विकृत, अभद्र, किळसवाणे वा हिंसकही अर्थ लावून तसे प्रत्यक्षात युगायुगांत व शतकांत आचरणात 'द्रव्य यज्ञ' 'स्मार्त यज्ञ' केले, हे जाणावे. त्याचे पूर्ण वर्णन मी योग्य वेळी नाईलाजाने करणार आहे, असे सध्या तरी म्हणतो!!

तरी पण, मग **<u>योगी अरविंदांना या वर्णनाचे एवढे कौतुक का वाटावे?</u>**

**योगी अरविंदांची विशेष बोध क्रिया**

कारण त्यांची स्वतः शोधलेली अर्थ लावण्याची साधना – होय!!

**''गिरीम उपश्रृतम् चर,<br>स्तोमान् अभि स्वर,<br>अभि ग्रविहि आ रूव।**

**" - to listen in soul to the old voices and allow the Shruti in the soul to respond, to vibrate, first obscuraly, in answer to the vedic hymn of knowledge, to give response, the echo and last to let that zorpouse gain in clarity, intensity and fulness."**



**Power and Speed Hoese**

ते म्हणतात, "This is the principle of interpretation. I have followed - mystical perhaps, but not necesarily more unsound than the insistence and equally personal Standards of the logician and the scholar."

त्याचे कारण मूळचे ब्रह्मज्ञानी वेदांती, हे गूढवादी जरूर असतील, पण त्यांनी जाणूणबूजून व हेतु पुरस्सर ह्या भाषेच्या स्वरूपाचा वापर केला की त्यामुळे व ह्या प्रयत्नांमुळे अल्पज्ञ, अल्पबुद्धी मानवालासुद्धा साक्षात्कारी पद्धतीने ऋषींच्या वैश्विक संकल्पनेचे अपरोक्षानुभूतीने आलेले ज्ञान व प्रत्यय आणि बोध मानवाला विदित व्हावा!!

महत्त्वाचे कारण हेआहे की, ह्या विश्वाच्या विराट संकल्पनेचे रचनात्मक व गतीमय अनंतातले स्वरूप हे व्यक्त, अव्यक्त जग व त्यांतले स्पिरीच्युअल भौतिक शक्ती व साधना स्वरूपे, यावर आधारलेले आहे. ते साध्या चर्मचक्षूंनी किंवा मर्यादित बुद्धी व मनाने जाणता येणे अशक्य आहे!!

अतिशय संक्षिप्तपणे ह्या अदृश्य अश्वाचे स्वरूप हे अनंतात घोडदौड करणाऱ्या घोड्याप्रमाणे आहे. त्याच्या डोक्यात व डोळ्यात गूढ स्वप्ने व भविष्य आहे. त्याच्या पाठीवर ह्या विश्वातले चराचर वस्तू जीव बसले आहेत. त्यातील मानवी स्वरूपातील देहबद्ध प्राणी ह्याचे वाहन हा 'अश्व' ह्या विशिष्ट संकल्पनेने करतो. (विशिष्ट चालीने करतो) पण ह्या प्राण्याच्या, 'देव, असूर, गंधर्व व मानव अशा ज्या जाती वर्गवारीने आहेत त्यांना हा विराट अश्व स्वतःच्या 'विशिष्ट चालीने' अनुरूप असे वाहन बनतो. त्याची क्रमाने 'हय, अर्वन, वाजिन व अश्व' अशी वेगवेगळी घोड्यांची स्वरूपे आहेत. कारण त्यांच्या चाली पाठीवरील स्वाराला अनुकूल आहेत!!

**''ये यथा माम् प्रपद्यन्ते तसं तथै व भजाग्यह्य्<br>मम वतरमान वर्तन्ते<br>मनुष्यः पार्थ सर्वषः।''** भ.गीता

हा एक गूढ अनाकलनीय 'अध्यात्म यज्ञ' चालला आहे. अनंतात व सतत व सूक्ष्मपणे!!

महत्त्वाचे दर्शन – **''अशनामा मृत्यू''** ह्या सद्य अवस्थेतून **''अमृतस्य पुत्रः''** ह्या पूर्ण स्वरूपाकडे हे वैश्विक अश्व वाहन 'अश्वमेध यज्ञाच्या' महान संकल्पनेने कालक्रमणा व घोडदौड करते आहे.

**अशनाया मृत्यू**

आता, **'अशनाया मृत्यू'** ही संकल्पना काय आहे?

भौतिक विज्ञानशास्त्र 'ब्लॅक होल' ह्या संकल्पनेपर्यंत गेले आहे. पण, मानवाचे ह्या सृष्टीच्या उत्पत्ती व प्रलय ह्या

प्रश्नांची उत्तरे तिथेही गूढ, असंबद्ध व मानवी तर्कबुद्धीच्या विलासांतच गुंग झाल्याचे आढळतात. मग विज्ञानाच्या तर्कवितर्कबुद्धीवर न विसंबता, तेवढाच अवसर आपल्या भारतीय संस्कृतीत श्रुती ज्ञानाच्या पातळीवरील ज्ञानाला, इथले विद्वान का सूट देत नाहीत व विचारार्ह मानत नाहीत? ह्याचे कारण, त्यांचा स्वतःचा पिंड भौतिक इंद्रियज्ञानाने मर्यादित पूर्वग्रही व युरोपियन भौतिक विज्ञानाच्या Brain Washing मुळे झालेला, म्हणजे त्यांची मेंदूची साफसफाई, आपल्या भौतिक संस्कृतीने इतिहासातील परकीय राजसत्तेच्या आधारावर व अत्यंत बालिश धर्म संस्थांकरवी केली, हा इतिहासात आहे.!!

तेव्हां, पुन्हा एकदा 'बृहद-अरण्यक' याच्या २ ऱ्या ब्राह्मणात कण्डिका १ कडे येऊ. 'मृत्यवाच्य ब्रह्मोपासना' असे शीर्षक महात्मा नारायण स्वामी यांनी त्यांच्या निवेदनाला दिले आहे.

ते म्हणतात :- (ब्राह्मण म्हणजे इथे प्रकरण, Chapter) ''प्रथम 'ब्राह्मण' में ईश्वर के विराट रूप के प्रकाशक संसार - 'अश्व' का वर्णन था। पर, इसकी उत्पत्ती कैसे होती है यह बतलाना इस 'दुसरे ब्राह्मण का' विषय है।'

''यह ऐसा अनुठा दृश्य संसारमें एक साथ उत्पन्न नही होता और संहार या प्रलय ही उसका एक साथ होता है। किन्तु उत्पन्न होने के समय प्रथम सूक्ष्म रूप में, पुनः स्थूल रूप में, प्रकट हो जाता है; पश्चात, प्रलय को प्राप्त होता हुआ भी 'सूक्ष्म रूप' आता है।

जैसे, मनुष्य आदि प्रथम जन्म लेता है, फिर जीवित रहता है, पश्चात मर जाता है, बस, इसी प्रकार इस **'संसार - अश्व'** की भी तीन अवस्थाएँ होती है।

'नैवेह किंश्चनाश्च . . . एवमेतदर्कस्यार्कत्वं वेद ।।१ ।।


**अशनाया मृत्यू - भूख रूपी मृत्यू - इश्वर से इदम्**

प्रारंभ मे (सृष्टि उत्पत्ति से पूर्व यह कुछ भी व्यक्त न था। **भूखरूपी मृत्यू** ईश्वर से यह सब ढका हुआ था।

**भूख को मृत्यू कहे जाने का कारण** यह है कि भूख किसी को नाही छोडती, यहाँ तक की अनेक जन्तु अपनी जननी का भी, भूख पिशाचनी के वशीभूत होकर भक्षण कर लिया करते है। महाभारत मे एक जगह कहा है कि वेणु, कदली और नल वृक्ष अपने नाश के लिए ही फलते है, केकडे की माँ अपने मरण के लिए गर्भ धारण किया करती है।

''यथा च वेणुः कदली नलौ वा
फलत्यभावाय न भूतये आत्मनः।
तथैव भातेः परिरक्ष्यमाणामादास्वते कर्करीव गर्भम् ।।''

महायोगी अरविंद म्हणतात, Yet, before we proceed to this enquiry - i.e. "that asva to the Rishis meant the unknown power made up of force, strength, Solidity\ Speed and enjoyment that pervades and constitutes the marterial world . . . it is as well to note that in the very opening of his second Brahmana, the Rishi, passes on immediately from Aswa the horse to "asanaya mryuh" (अशनाया मृत्यू)hunger that is death and assigns his hunger that is death as the charateristic, indeed the very nature of the Force that has arranged and developed - evolved, as the moderns say - the "Material Worlds"



ह्या उपनिषदाचे ऋषी हे 'अश्व' - ही ह्या विश्वाच्या विराट स्वरूपाची ओळख करून देतात व हा 'अश्व' एक शक्ती, ताकद, गती. असलेला व आपल्या पाठीवर घेऊन मानव इतर सर्व 'जीव जगत', ह्यांना एकत्रच एका ध्येयाप्रत घेऊन जाणारे वाहन आहे. ह्या कल्पनेनंतर ते ऋषी एकदम 'अशनाया मृत्यू' ह्या संकल्पनेवर येतात, ते का? तसेच, हा अश्व एखादे भौतिक 'प्रचंड प्राणी स्वरूप' असा आभास उत्पन्न होऊ लागला असताना, ते ह्या अश्वाचे शरीर व आत्मा, हा एक 'काल' (Time) बद्ध स्वरूप आहेत असे पहिल्या ब्राह्मणात का सांगतात?

ह्याचे कारण जाणणे फार महत्वाचे आहे. महायोगी अरविंद सांगतात की, 'upanishads have a deep enough significance once we can get inside their "Symbolic meaning" . That appears in a psycho-physical passing upward into a psycho-spiritual Knowledge for which we would now use more intellectual, Less Concrete and imaged terms, but, which is still valid for those who practise yoga. and discover the secrets of our psycho-physical and psycho-spiritual being''

थोडक्यात, महायोगी अरविंद सांगताहेत की हे उपनिषद प्रथम आपल्याला ह्या जगताच्या विराट स्वरूपाची कल्पना अलंकारिक किंवा प्रतीकात्मक अश्व शरीर व उषा, काल, चक्षु, तोंड, पार्श्वभाग, पाठ, चार खूर, अध्वगतीचे चालीचे प्रकार वगैरे पृथ्वीवरील एखाद्या घोड्याच्या परिचित अवयक व गतीच्या ज्ञानावर आधारलेल्या प्रतीकामार्फत देऊन नंतर विश्वातील 'उषा, काल, सूर्य, चंद्र' यांच्याशी जोडून एक गूढ पण अर्थगर्भ संबंध जोडावयाला सांगतात. पण, त्यामुळे हा विराट अश्व हा एक न दिसणारा, पण भौतिकातील शरीरस्वरूप घोडा आहे अशा भावनेपासून एकदम दूर खेचून तो 'एका गूढ उत्क्रांती तत्त्वाकडे' त्याच्या गतीचे, चालीचे, अस्तित्वाचे भान व चित्र आणून देतात. ते त्याचे 'काल स्वरूप' आहे असे सांगतात तेव्हा हा काल म्हणजे आपले भौतिक घड्याळाचे परिमाण नव्हे, तर ज्या काळ ह्या संकल्पनेचा अजूनही वैज्ञानिकांना, विचारकाना पत्ता लागलेला नाही त्या कालाचा संदर्भ देतात. हा 'काल देवता स्वरूप 'कालीमातेसारखे' आहे व त्याचा सर्व जन्मलेल्या वस्तूंवर संपूर्ण प्रभाव आहे.

"What is born shall die" जे जन्मले ते मृत्यू पावणार ह्या वचनाची स्मृती करून देतात. ह्याचा अर्थ ह्या घोड्याच्या पाठीवर हे शापित जीव 'अन्नाचे भक्ष व मृत्यूचे ही भक्ष असणाऱ्या शापाने ग्रासलेले आहे. आणि मग ह्या 'अश्वमेधाचा यज्ञ' हा त्यांना अमृतस्य पुत्रः' ह्या भविष्याप्रत घोडदौडीने नेत आहे असे उपनिषद्कार सांगताहेत्''

केवढे खोल गूढ, सत्य चित्र आपल्यासमोर ते मांडताहेत. केवढी गती युक्त संकल्पना सांगताहेत हा देहबद्ध जीवात्मा हा एक मानस-वस्थचीज व मानस-स्पिरीच्यूअल, अध्यात्मिक 'Being' आहे. 'Being to Becoming' हे त्याचे सूत्र आहे. त्याची धाव 'अशनाया मृत्य' ह्या शापित अस्तित्वापासून दूर अनंतात फळणाऱ्या 'अमृतस्य पुत्रः' ह्या स्वरूपाकडे आहे हे सांगण्याचा हा केवढा प्रचंड कल्पनाशक्तीच्या सामर्थ्याचा प्रयास!! केवळ धार्मिक श्रद्धेपासून ब्रह्मज्ञानाकडे मानवी बुद्धीला, अंतर्ज्ञानाला नेण्याचा केवढा हा अतुलनीय प्रयत्न.!!

पण, हा उपनिषदकार ऋषीच्या प्रयत्नाचा व महायोगी अरविंदांचा आपल्याला या गूढ रहस्याचा परिचय करून देण्याच्या प्रयत्नाचा प्रत्यक्षात 'अश्वमेध यज्ञ' हा कर्मकांडी संप्रदायांनी कसा बघ्याबोल केलेला आहे ते पाहू या पुढच्या दिशाच्या अंकातून.

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे. दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

जाणत्यासमोर आपले गुण सांगू नयेत, कारण तो ते स्वतःच जाणतो. मूर्खासमोरही सांगू नयेत, कारण शहाण्याने सांगितलेले त्याला कळत नाही.

# परिसर वार्ता

*महत्त्वाची टीप - परिसरवार्ताचा मजकूर मराठीत असणे आवश्यक आहे - संपादक*

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

*पाऊस आला वारा आला*
*पान लागले नाचू*
*थेंब टपोरे गोरे गोरे*
*भरभर गारा वेचू*

असे म्हणत लहान व मोठ्या शिशुची मुले पावसाचे थेंब आपल्या चिमुकल्या हाताने झेलत थोडीशी हासत तर थोडीशी रडत शाळेत हजर राहिली. पाहिल्याच दिवशी शाळेत मुलांचे गोळ्या देऊन स्वागत करण्यात आले. सोमवारपासून शाळा नेहमीप्रमाणे सुरू झाली.

**पालकसभा :**

लहान व मोठ्या शिशुची पालकसभा घेऊन शिक्षकांनी पालकांना आनंददायी शिक्षणाची प्रात्यक्षिकाद्वारे माहिती करून दिली. वर्षभरात शाळेत होणाऱ्या स्पर्धा, उपक्रम व सण कसे साजरे केले जातात ते सविस्तर सांगितले. प्रतिवर्षाप्रमाणे मोठ्या शिशुची दिंडी काढण्यात आली. पंढरीच्या वारीचे महात्म्य काय? याची महती पंढपूरच्या वारीला सामील झालेल्या वारकऱ्यालाच माहिती असते . मात्र वारीचे महत्त्व विद्यार्थ्यांनापण समजावे या उद्देशाने दिंडी काढण्यात आली होती. रिंगण, फेर, गजर यांनी तर पूर्ण शाळा दुमदुमून गेली होती. जणू काही बालपंढरीच अवतरली होती. सर्व मुले वारकऱ्यांच्या वेशात व मुली नऊवारी साडीत खूपच छान दिसत होत्या. मुलींनी डोक्यावर तुळशी वृंदावनपण घेतले होते. तसेच छोट्याशा पालखीबरोबर छोटीशी मुलगी मुक्ताईचा वेश करून चालत होती. शेवटी सर्व मुलांना साखर फुटाण्याचा प्रसाद देण्यात आला.

**गुरुपौर्णिमा :**

प्रत्येक वर्गात द्रोणाचार्य - एकलव्य, रामदास स्वामी - शिवाजी महाराज अशा प्रकारे गुरुशिष्यांच्या छान जोड्या केल्या होत्या. तसेच गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले.



**गुरुपौर्णिमा - गुरु व शिष्यांच्या जोड्या**



**आषाढी एकादशी - बाल दिंडी**

**दीपपूजा :**

सर्व प्रकारचे दिवे मांडून व प्रत्येक दिव्याची माहिती सांगून दीपपूजा करण्यात आली. सर्वत्र शुभकारक घटना घडोत, सर्वांचे कल्याण होवो, सर्वांना आरोग्य, धन प्राप्त होवो, वाईट बुद्धीचा नाश होवो, व आपल्या जीवनातील अंध:कार नाहीसा होऊन आपले जीवन प्रकाशमय बनो अशी प्रार्थना मुलांनी दिव्यांजवळ केली.

*रात सरे उजळती,*
*ज्ञानदिशा प्रकाशती*
*ज्ञानदीप ज्ञानवाती*
*चला लावू या सांगाती*

या कडव्याने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**नागपंचमी :**

नागपंचमीच्या दिवशी मातीचे छोटेसे वारूळ करून त्यावर मातीचे नाग ठेवून त्यांची पूजा करण्यात आली. नागोबाला साळीच्या लाह्या, दूध, दिंड व पुरणाचा नैवेद्य दाखवला. प्राणिमात्रांवर दया करणे व त्यांना त्रास न देण्याचे महत्त्व मुलांना पटवून दिले. 'नागपंचमीच्या सणी, उठा उठा साऱ्या जणी' या गाण्यावर सर्व शिक्षक व मुलांनी फेर धरून आपले पारंपरिक खेळ मुलांना करून दाखवले. अशा प्रकारे सर्व सण साजरे करून श्रावण महिन्याचे व आपल्या संस्कृतीचे महत्त्व पटवून दिले.

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर (प्राथमिक विभाग)

**स्वागत :**

१६ जून रोजी २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता १ली ते ४ थी चे वर्ग मोठ्या उत्साहात सुरू झाले.

इयत्ता १ली च्या विद्यार्थ्यांचे खास स्वागत करण्यात आले.

**मोफत पाठ्यपुस्तक वाटप :**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत शासनाने दिलेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप १६/६/२०११ रोजी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. बसवराज बन्ने सर व समितीचे इतर सभासद यावेळी हजर होते कार्यक्रमाच्या वेळी मा. मुख्याध्यापिका सौ. भंडारे, सहा शिक्षिका सौ. कडव , सौ. राणे उपस्थित होत्या.

**आषाढी एकादशी (बालदिंडी) :**

१३ जुलै रोजी प्राथमिक विभागातील इ १ली ते ४ थी च्या बालवारकऱ्यांची दिंडी काढण्यात आली. दिंडीसाठी जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांना एकादशीचे महत्त्व, वारकरी सांप्रदयाची माहिती व विठ्ठल महिमा शिक्षकांनी कथन केला. विठ्ठल रखुमाईची पूजा करण्यात आली. टाळ मृदंगाच्या गजरात व विठ्ठलाच्या नामात अवघे विद्यामंदिर दुमदुमले. शेवटी विठ्ठल नामाची आरती करून विद्या चांगली मिळू दे, चांगले संस्कार आमच्यावर होऊ दे, अशी प्रार्थना केली.

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे (माध्य) विभाग

★ मार्च २०११ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आपल्या शाळेचा निकाल ८०% लागला. खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

१) मयंक गणेश शेटे - २२२ गुण, जिल्ह्यात २२ वा

२) स्वानंद रविंद्र बेहरे - २१८ गुण, २९ वा

३) श्वेता एकनाथ देसले - २१० गुण, ३३ वी

४) अभिषेक राजेंद्र ठाकूर - १९८गुण, ३९ वा

सौ. तातळे, सौ. धोत्रे व श्री. देवघरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

★ ब्राह्मण सेवा संघ, ठाणे - शिक्षण सहाय्यक समितीतर्फे घेण्यात आलेल्या संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेत आपल्या शाळेतील तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

१) प्रणिता हनुमंत काळभोर ९६गुण, द्वितीय

२) स्नेहल सखाराम पाटिल - ९० गुण, सातवी

३) अकुंर राजेंद्र पांचाळ - ९० गुण, सातवा

श्री दीपक धोंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

---

प्रत्येक वाढदिवसाला तुम्हांला नवे जीवन सुरू करण्याची संधी मिळते. - सॅम हॅगर

★ इ. १० वी अभ्यासक्रम प्रशिक्षण, जि.प ठाणे यांच्या मार्फत टीजे हायस्कूल, खारकर आळी, ठाणे येथे घेण्यात आले. या प्रशिक्षण वर्गास विज्ञानासाठी

१) सौ. वंदना विश्वास अडसूळे व श्री. प्रविण एकनाथ खैरनार व गणित विषयासाठी १) श्री. सुभाष धनाजी सोटटे व २) श्री. मोहन शंकर शेकवले हे उपस्थित होते.

★ फेब्रु २०११ मध्ये घेण्यात आलेल्या स्काऊट-गाईड राज्य पुरस्कार परीक्षेत इ ९वी मधील २ स्काऊट व ७ गाईडस् बसविण्यात आले होते सर्व स्काऊट व गाइडस् परीक्षेत उत्तीर्ण झाले. व त्यांना राज्यपुरस्कार येत्या आक्टोंबर मध्ये प्रदान करण्यात येणार आहे. याचे सर्व श्रेय त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सौ. बोरवणकर यांना जाते.

★ १ जुलै रोजी ठाणे जिल्हा भारत स्काऊट आणि गाईड संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या वृक्षदिंडीत आपल्या शाळेतील एकूण ६० स्काऊट व गाईडस् सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. बोरवणकर यांनी केले त्यांच्या सोबत स्काऊट मास्तर श्री. पांचाल हेही होते.

★ दि. ५/७/११ ते ९/७/११ या कालावधी मध्ये नॅशल ट्रेनिंग सेंटर पथमढी, मध्यप्रदेश येथे १० वी नॅशनल बनी लिडर ट्रेनिंग कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. या कोर्ससाठी प्रत्येक राज्यातून दोन गाईड कॅप्टनची निवड करण्यात आली होती. त्यात महाराष्ट्रातून सौ. बोरवणकर यांची निवड झाली. त्यांना लंडन स्कॉऊट गाईड संस्थेतर्फे देण्यात येणारा ऑल राऊन्डर बॅच मिळाला. हा बॅच मानाचा समजला जातो.

★ दि. १६ / ७ / ११ रोजी महाराष्ट्र शासन समाजिक वनीकरण तर्फे वृक्षारोपण व वनमोहत्सवाचे आयोजन संजय गांधी राष्ट्रीय उद्यान मानवाडा येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात आपल्या शाळेतील स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी वृक्षांची लागवड केली. तेथील औषधी वनस्पती पशू पक्षी कीटक यांची माहिती संकलित केली त्यांच्या सोबत शाळेतील गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर ह्या उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन त्यांनी केले होते.

★ भारत सरकारतर्फे घेण्यात येणाऱ्या 'Insprire Award 2011' विज्ञान प्रदर्शनात आपल्या शाळेतील कु. प्रणिता काळभोर (९ अ) हिने सादर केलेला 'ड्रेनेजचा विळखा' या प्रकल्पाची राज्यस्तरासाठी निवड झाली. राज्यस्तरीय प्रदर्शन नाशिक येथे झाले. वरील प्रकल्पासाठी श्री. तळेले व सौ. अडूसळे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.


## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम :

**१००% निकाल : परीक्षेला बसलेले विद्यार्थी-१९**

ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी :

१) ओम् बापट – सहावा क्रमांक
२) नील खिमसिया – सातवा क्रमांक
३) अनुजा मुसळे – सातवा क्रमांक
४) सानिका नवरे – आठवा क्रमांक
५) ऋतुजा धनावडे – नववा क्रमांक
६) कृत्तिक मेणकुदळे – नववा क्रमांक

**मार्च २०११ च्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल :**



**एकूण विद्यार्थी – १९४**
परीक्षेला बसलेले विद्यार्थी – १९४
उत्तीर्ण विद्यार्थी – १९३
टक्केवारी – ९९. ४८%

**विशेष प्राविण्य – १३१**
प्रथम श्रेणी – ४९
द्वितीय श्रेणी – १२
तृतीय श्रेणी – ०१

| टक्के | सर्वोत्तम पाच विषयातील विद्यार्थी संख्या | % |
|---|---|---|
| ९० आणि आधिक | ५७ | ३० |
| ८० – ८९ | ५२ | ३० |
| ७० – ७९ | ४५ | २३ |
| ६० – ६९ | २६ | १३ |
| ५० – ५९ | ११ | ६ |
| ४९ च्या खाली | २ | १ |

**पहिले दहा क्रमांक – विशेष २५ क्रीडा गुणां व्यतिरिक्त :**

| क्र. | विद्यार्थ्यांची नावे | एकूण गुण | गुण | % |
|---|---|---|---|---|
| १ | प्राची जैस्वाल | ५५० | ५३२ | ९६.७३ |
| २ | मृण्मयी जोगलेकर | ५५० | ५२९ | ९६.१८ |
| ३ | प्रियज नाबर | ५५० | ५२८ | ९६.०० |
| ४ | पुष्कर ओक | ५५० | ५२७ | ९५.८२ |
| ५ | रिया दाते<br>अद्वैत रणदिवे | ५५० | ५२५ | ९५.४५ |
| ६ | सिमरन भांगले | ५५० | ५२४ | ९५.२७ |
| ७ | प्रियंका मोटा<br>राधिका पाटील<br>सुप्रिया पाटील<br>प्रिया पुराणिक | ५५० | ५२३ | ९५.०९ |
| ८ | श्रेया बापट | ५५० | ५२२ | ९४. ९१ |
| ९ | शरीवा जोशी<br>मिहीर मुसळे | ५५० | ५२१ | ९४.७३ |
| १० | सलिल जोशी<br>केतकी जोगळेकर<br>रुपाली पिसाट | ५५० | ५२० | ९४.५५ |

**विषयातील सर्वप्रथम क्रमांक :**

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | सुप्रिया पाटील | ८९ |
| मराठी | प्रिया पुराणिक | ९० |
| | प्राची जैस्वाल | ९० |
| संस्कृत | मृण्मयी जोगळेकर | ९९ |
| | अमित पाटणकर | ९९ |
| | पुष्कर ओक | ९९ |
| हिन्दी | हर्षाली मुगुटराव | ८८ |
| गणित | प्राची जैस्वाल | १४९ |
| विज्ञान | प्राची जैस्वाल | ९८ |
| | अद्वैत रणदिवे | ९८ |
| | प्रियंका मोटा | ९८ |
| | रुपाली पिसाट | ९८ |
| | प्रियंका नुलकर | ९८ |
| | सलिल जोशी | ९८ |
| समाज शास्त्र | शरीवा जोशी | ९८ |
| | प्रियज नाबर | ९८ |
| | रिया दाते | ९८ |
| | श्रेया बापट | ९८ |

### बांदोडकर विज्ञान महाविद्यालय :

● बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या अकरावी, बारावी, तृतीय वर्ष विज्ञान शाखा, प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल खालील प्रमाणे आहे.

| इयत्ता | प्रथम वर्ग प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | तृतीय प्राप्त विद्यार्थी | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| अकरावी | ११२ | २३५ | ११९ | ०७ | ९८.९५ |
| बारावी | ७७ | २०८ | १५५ | २१ | ९५. ०४ |
| प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा | ०५ | २२ | ५८ | | ९२. १० |
| द्वितीय वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा | २३ | ३८ | ४० | ०८ | ९९.१२ |
| तृतीय वर्ष विज्ञान शाखा | ०८ | ४१ | ७० | ०१ | ६८.५७ |

**प्रत्येक इयत्तेतील पहिले तीन विद्यार्थी**

| क्रमांक | अकरावी | बारावी | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | प्रशांत सुरेश चव्हाण | शेफाली अनिल सावंत | दिपाली गोपाल अबनावे | योगेश नामदेव मोरे | अमितकुमार उपेंद्र तिवारी |
| द्वितीय | शाहिल राजेश धायळकर | रोषनकुमार ओमप्रकाश जयस्वाल | सोनिया मुरड बाबवानी | तीर्था भास्कर शेट्टी | कांचन विद्याधर जोशी |
| | निदा सरफराज खान | | | | |
| तृतीय | पूजा सुनिल देवळे | अमिन इफ्तेकार अन्सारी | सुप्रिया श्याम पोरे | ओमकार वासुदेव मांजरेकर | प्रियांका रामेदर वर्मा |

● **गणित व संख्याशास्त्र विषयाकरिता क्रेडिट बेस ग्रेडिंग सिस्टीम कार्यशाळा :**

गणित व संख्याशास्त्र विषयाकरिता क्रडिट बेस ग्रेडिंग सिस्टीम ही कार्यशाळा दिनांक २१ जून रोजी पतंजली सभागृहात घेण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन उपप्राचार्य विनायक बुरकुले यांच्या हस्ते झाले. डॉ. संतोष शेंडे, वर्तक महाविद्यालय, वसई हे प्रमुख वक्ते होते. गणित विषयाकरता असणाऱ्या टुटोरियल असाइनमेंटस व क्लास टेस्ट याबद्दल चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेला मुंबई विद्यापीठाशी संलग्नित ६० महाविद्यालयांमधून ८५ प्राध्यापक उपस्थित होते.

**क्रेडिट बेस ग्रेडिंग सिस्टीम कार्यशाळा :**

क्रेडिट बेस ग्रेडिंग सिस्टीम यावर कला वाणिज्य व विज्ञान शाखांतील प्राध्यापकांसाठी दि. १५ जून रोजी कार्यशाळा पतंजली सभागृहात घेण्यात आली होती. यावेळी डॉ. एस. बी. पाटील माजी अधिष्ठाता विज्ञान शाखा मुंबई विद्यापीठ यांनी या सिस्टीमबद्दल माहिती व त्याचा विद्यार्थ्यांना होणारा फायदा याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. के. जी. भोळे अध्यक्ष भौतिकशास्त्र अभ्यासमंडळ व डॉ. एस. बी. पाटील यांनी उपस्थितांच्या प्रश्नांचे समर्थन केले. या कार्यशाळेला १५ महाविद्यालयांमधून ५८

तत्त्वांपेक्षा फायद्याला महत्त्व देणारा लवकरच दोन्ही गोष्टी गमावतो. – आयसेनहॉवर

प्राध्यापक उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष २०११ – २०१२ मध्ये नव्याने सुरू करण्यात आलेल्या क्रेडिट बेस ग्रेडिंग सिस्टीमवर ही अतिशय उपयुक्त कार्यशाळा घेण्यात आली.

## विधी महाविद्यालय

ठाणे विधी महाविद्यालयाच्या सर्व वर्गांचे मुंबई युनिव्हर्सिटीचे एप्रिल २०११ चे निकाल खालीलप्रमाणे आहेत.

महाविद्यालयाचा निकाल व विद्यापीठाचा निकाल

प्रथम वर्ष ३७.७०%/२३.८१%

द्वितीय वर्ष ५३%/३८.८६%

तृतीय वर्ष ४९. ८२%/४३. ६५%

तसेच महाविद्यालयाचे द्वितीय व तृतीय वर्षाचे वर्ग दि. ७. ७. २०११ पासून सुरु झाले.

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) उन्हाळी २०११ – २०११ परीक्षेचे निकाल जाहीर**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या उन्हाळी २०११–२०११ या वर्षीच्या परिक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले आहे. तंत्रनिकेतनमध्ये अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांची कोर्सनुसार नावे व गुण खालील प्रमाणे

**प्रथम वर्ष (SEM I + SEM II)**

१)बागुल निखिल दीपक CH १२४१/१६७५ ७४.०९%

२)चौबे अपूर्व बिमल CO १४४२/१६७५ ८६.०९%

३) मोरे यश रवींद्र EPS१३४२/१६७५ ८०.१२%

४)साजेकर महेश्वरी शंकर IE १३२७/१५५० ८५.६१%

५)कदम सलजीत श्रीकांत IF १४१७/१६७५ ८४.६०%

६)विसारिया हार्दीक नेमचंद IS १२२३/१५५० ७९.५४%

७)घाग दक्षता दत्ता MU १२२४/१५५० ८०.५६%

**द्वितीय वर्ष (SEM III + SEM IV)**

१)अन्सारी शमीम इन्बाल CH १२४७/१६७५ ७४.४४%

२)पाटील कोमल रवीद्र CO १३०२/१५७५ ८२.६६%

३)त्रिपाटी सुनील रमेशचंद्र EPS १४२९/१८०० ७९.३८%

४)शुक्ल विश्वप्रकाश सुरेशप्रसाद IE १५५५/१७५० ८८.८५%

५)पठाण श्रमीन असीफखान IF १३०२/१५०० ८६.८०%

६)तानाजी अदनान निसार IS १३५६/१७५० ७७.४८%

७) बंदबे तेजस नामदेव MU १२८७/१७७५ ७२.५१%

**तृतीय वर्ष (SEM V + SEM VI)**

१) पुथुर यासीर युसूफ CH १३६७/१६०० ८५.४३%

२) नवले प्रवीण भैरु CO १२९५/१४५० ८९.३१%

३) टिपनीस दर्शन सुनिल EPS १३३६/१५५० ८६.१९%

४) खोत संकल्प जयंत IE १५०६/१६५० ९१.२७%

५) गंधरे प्राची मधुलकर IF १३२०/१५०० ८८.००%

६)कोटीयन आदित्य जगजीवनदास IS १३९२/१६०० ८७.००%

७)पाटकर प्रथमेश किशोर MU १४८१/१७०० ८७.१२%

वरील यशवी विद्यार्थ्यांचे वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग यांचेतर्फे अभिनंदन करण्यात आले.

---

शिक्षणाचा टप्पा कोणताही असो, प्रत्येक टप्प्यात अचूक मार्गदर्शन, जास्तीत जास्त ज्ञानग्रहण व योग्यवेळी त्याचे स्मरण ही शिक्षणत्रयी महत्त्वाची आहे.

## तंत्रनिकेतन वार्ता

- श्री. श्रीधर व्ही. गोवेकर हे वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम विभागात प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून दि. ०१. ०८. १९८८ पासून कार्यरत होते ते आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३० जून २०११ रोजी सेवानिवृत्त झाले.
- अशासकीय शिक्षकेतर कर्मचारी युनियनच्या तंत्रनिकेतन युनिटचे ते सदस्य होते. त्यांचा युनियनतर्फे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील आयुष्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.
- विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन मध्ये अत्याधुनिक अशा बायोमेट्रिक अॅन्टेडन्स सिस्टिम दि. १ जुलै पासून कार्यान्वित झाली आहे.

**अभिनव गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी :**

तंत्रनिकेतन मधील इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स डिपार्टमेंटमधील विद्यार्थ्यानी अभिनव अशी गुरुपौर्णिमा साजरी केली. इलेक्ट्रॉनिक्स विषयातील विविध मॉडेल्स आणि छोटे प्रोजेक्ट यांचे या प्रसंगी आयोजन केले होते. अशा आयोजनामागे गुरुजनांच्या प्रती असलेला आदरभाव आणि गुण व्यक्त केले. शिवाय कॉलेजमधील प्राध्यापकांना आमंत्रित करून एक टॉक शो आयोजित केला होता.

शिक्षकांच्या यशाचे रहस्य, त्यांच्या अडचणी मुलांशी त्याचा होणारा सुसंवाद शिवाय नवीन पिढीच्या अडचणी अशा अनेक विषयावरच्या संवादात प्राचार्य दि. कृ. नायक, परीक्षा नियंत्रक सुजाता गुप्ते, इलेक्ट्रानिक्स विभाग प्रमुख कीर्ती आगाशे उषा राघवन (आयटी विभाग प्रमुख) इत्यादीनी मनमोकळी उत्तरे दिली.

विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केलेल्या मॉडेल्समध्ये रेल्वे पॉवर सेव्हर, वॉटर कंट्रोल, इलेक्ट्रॉनिक प्लॉवर पॉट डिजिटल लेटर बॉक्स इत्यादींचा समावेश होता. अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यानी प्रतिकृती तयार करुन उपस्थितांना त्या मागच्या तंत्राची माहिती दिली. यातील यशस्वी विद्यार्थ्यानी बक्षिसे देण्यात आली. वैशाली जोशी (IS विभाग प्रमुख व तुषार मोहिते पाटिल MU विभाग प्रमुख) यांनी त्यांचे परीक्षण केले.

विद्यार्थ्याच्या या योजनेची संकल्पना आणि मार्गदर्शन प्रा. कीर्ती अगाशे (IE, विभाग प्रमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.

वृत्त संकलन<br>**श्री. चंद्रकांत शिंगाडे**<br>वि. प्र. म. चे तंत्रनिकेतन ठाणे

---

ऑर्केस्ट्राचे नेतृत्व करु इच्छिणाऱ्याला गर्दीकडे पाठ करावी लागते. – मॅक्स ल्युकॅडो

(मलपृष्ठ २ वरून )

**संपादकीय**

राजकीय, सामाजिक, आध्यात्मिक विषयात गाढा तर सोडाच, पण चांगला व्यासंग असण्याचाही त्यांचा इतिहास नाही. तरीही या पक्षाने पक्षांतर्गत लोकशाहीच्या माध्यमातून या शुद्ध घराणेशाहीवर वारंवार शिक्कामोर्तब केले आणि आजही त्यांचे समर्थन चालू आहे. मुद्दा आहे तो समर्थन करणाऱ्या विचारवंतांचा. ऐकणारे व वाचणारे बहुतेक महामूर्ख आहेत हे गृहीत धरूनच यांचा युक्तिवाद चालू असतो. शंभर कोटींच्या या देशात एकही पात्र व्यक्ती या पक्षाला मिळत नाही, हीच या लोकशाहीची खरी शोकांतिका आहे. हरयाणा असो, ओरिसा असो, महाराष्ट्र असो किंवा तमिळनाडू असो, सर्व प्रांतीय पक्ष सुद्धा याच 'लोकशाही' मार्गाने घराणेशाही राबवत आहेत.

लोकशाहीत जात, धर्म, पंथ, आर्थिक दर्जा वगैरेचा विचार करायचा नसतो हे घसा फुटेस्तोवर ही सर्वच मंडळी ओरडून सांगत असतात. पण या सगळ्या पक्षांनी दिलेले बहुसंख्य उमेदवार 'जात' या एकाच कसोटीवर तपासून पाहून दिलेले असतात. पंधरा ते वीस टक्के लोकसभेत निवडून दिलेले प्रतिनिधी हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. अर्थात लोकांनी त्यांना 'निवडून' दिलेले असल्यामुळे त्यांच्या बाकीच्या सर्व पार्श्वभूम्या आपण विसरून जायला हव्यात हाच यांचा आग्रह असतो. प्रत्येक पक्षाने अशी पार्श्वभूमी असलेल्यांना तिकीट दिलेल्यांची संख्या तर किती तरी अधिक आहे. हे सर्व लोकशाहीच्या समर्थनार्थ चालू आहे. आदिवासी-शहरवासी, बहुजन-महाजन, गरीब-श्रीमंत, बहुसंख्य-अल्पसंख्य, शहरी-ग्रामीण अशा अनेक कप्प्यामध्ये समाजाला विभागायचे, मग त्यांना सवलतग्रस्त, लाचार बनवून ठेवायचे आणि हे सर्व लोकशाही 'सशक्त' करण्याकरता आहे अशा वल्गना करायच्या. आजच्या आपल्या लोकसभा आणि विधानसभेतील लक्षाधीश आणि कोट्याधिशांची संख्या बघीतली की या वाचाळ लोकशाही रक्षकांचा कोडगेपणा दिसून येतो.

आजच्या श्री. अण्णा हजारेंच्या चळवळीची पार्श्वभूमी ही आहे. भ्रष्टाचार आणि घराणेशाहीने सामान्य माणूस मेटाकुटीला आला आहे. ठाण्यापुरते म्हणाल तर, आमचे विधानसभेतील प्रतिनिधी विधानसभेतील अभ्यासपूर्ण भाषणांपेक्षा विधानसभेबाहेरील आरडाओरड्यात जास्त दिसतात. एकीकडे वाढती गरिबी. त्यांना घरे, अन्न, शिक्षण द्या असल्या सवंग घोषणा करतात, तर स्वतः मात्र लाखो नाही तर कोटींच्या दही हंड्या जाहीर करण्यात मग्न असतात. केवढा हा दांभिकपणा आणि विसंगती! ज्या लोकप्रतिनिधींनी कटाक्षाने, आग्रहाने सामाजिक नियमांचे पालन करायचे, तेच आपला 'रुबाब' दाखवण्याकरता सर्व नियम पायदळी तुडवण्यात धन्यता मानतात. यांच्यावर टीका केली तर ती लोकशाहीवर टीका असल्याचे भासवायचे, कारण काय तर हे सर्व लोकप्रतिनिधी लोकशाही पद्धतीने निवडून आले आहेत, म्हणून!! लोकसत्तेतील उपरोक्त अग्रलेख, '' आता सारे जगच अण्णांना बदलायचे असल्यास गोष्ट वेगळी, पण तसे होत नाही तोपर्यंत तरी त्याना या व्यवस्थेचे नियम पाळावेच लागतील'' असे अण्णांना बजावतो. 'व्यवस्था' बदलण्याचा आग्रह सर्वच नेतृत्वाचा असतो तसाच तो माध्यमांचाही असतो. ज्या वृत्तपत्रीय नीतीमध्ये जाहिराती आणि बातम्या, सारख्याच दराने विकल्या जातात त्यांनी हा प्रश्न अण्णांना विचारावा हा एक मोठा विनोदाचाच भाग आहे. येथे प्रश्न एका वृत्तपत्राचा वा अग्रलेखाचा नसून संपूर्ण वैचारिक नेतृत्वाचा आहे. उच्चार स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य अशा सीमारहित स्वातंत्र्यांच्या भन्नाट संकल्पना मांडत या स्वातंत्र्यांचे आपण स्वैराचारात रूपांतर करत आहोत, याचे भान या विचारवंतांनी कधी

ठेवले आहे काय? गांधीजींच्या राजकीय मतांशी कोणी कितीही सहमत वा असहमत असो; पण ते शुद्ध चारित्र्याचे आग्रही होते, याबाबत कोणाचंच दुमत होण्याचे कारण नाही. राहणीतला साधेपणा,निर्व्यसनीपणा, पराकोटीची सहिष्णुता हे त्यांच्या विचारांचे आणखीन काही महत्त्वाचे पैलू आहेत. गेल्या अनेक पिढ्यांत 'या' मूल्यांशी काही संबंध आलेला नसावा, असे वागणारे महाभाग 'आम्ही गांधीवादी आहोत', असे सांगतात तेव्हा हसण्याचेही त्राण शिल्लक रहात नाही. गांधीजींचा सत्याग्रह, उपोषण यांचा उठता बसता घोष करणारे हे वैचारिक नेतृत्व अण्णा हजारेंच्या उपोषणास मात्र ते 'कालबाह्य' आहे 'अलोकशाहीवादी' आहे हे उच्च रवाने सांगताना दिसतात तेव्हा त्यांच्या या धैर्याकडे पाहून स्तंभित व्हायला होते.

लोकशाहीचा 'आधार' हा नागरिक आहे. तो संपूर्णतः 'उपभोक्तावादी', 'श्रद्धाहीन' आणि 'भोगवादी' बनवून त्याच्याकडून 'संतसदृश' विवेकी मतदानाची अपेक्षा धरणे म्हणजे दारूच्या गुत्त्यात जाऊन दुधाची मागणी केल्यासारखे आहे. या व्यवस्थेत बदल करणे आवश्यक आहे. याची साधने या समाजात हजारे वर्षे रुजू होती. पण, 'पुरोगामित्व' व 'आधुनिकते'च्या नावाखाली गांधीजींच्या सच्च्या अनुयांनीही त्यांची अवहेलनाच केली. आजचे स्त्रीमुक्तीचे स्वरूप हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. 'स्वातंत्र्य,' 'हक्क' आणि 'मुक्ती' या सनातन संकल्पना आहेत. त्या जगवण्या करता 'तशी' सामाजिक व्यवस्था असणे हे जास्त महत्त्वाचे आहे. कारण असा नागरिक जेव्हा 'बहुसंख्य' होईल तेव्हा लोकशाहीच काय, एकाधिकारशाहीही जास्त 'सामाजिक' न्याय देईल. अण्णा हजारे यांनी अशा बेगडी गांधीवादी, पण प्रत्क्षात नक्षलवादासारख्या हिंसाचाराला पाठिंबा देणाऱ्या सहकाऱ्यांपासून दूर राहणे आवश्यक आहे. आणि म्हणूनच या चळवळीकडे अधिक सकारात्मक आणि व्यापक बदलाचे एक साधन म्हणून पाहणे आवश्वक आहे तसेच पाश्चात्य संस्कृतीत ज्याची बीजे रुजली आहेत अशा साम्यवादी आणि संख्याबळावर आधारीत लोकशाहीलाही प्रर्याय असू शकतो या विचाराला चर्चा किंवा अशा संवादांमध्ये स्थान देणे ही महत्वाचे आहे. अर्थातच लोकसत्तेच्या अग्रलेखात उल्लेख केलेल्या मेणबत्ती संप्रदायाच्या विचारवंतांची तशी क्षमता आणि कुवत नाही.

अण्णांच्या या आंदोलनानी अनेक महत्त्वाचे प्रश्न निर्माण केले आहेत. त्यांचा खल होणे आवश्यक आहे. ते गैरसोइचे आहेत म्हणून नाकारणे म्हणजे याही पेक्षा मोठ्या आंदोलनांना आमंत्रण देणे आहे. सिद्धांताकरता माणसं जगतात आणि जीवन त्यागही करतात. पण सिद्धांताचे परिवर्तन जेव्हा सिद्धांत मांडणाऱ्या व्यक्तीच्या 'व्यक्तीमहात्म्या'त होते तेव्हा असे सिद्धांत 'राजकीय' हत्यार होतात आणि अशा सिद्धांतांशी सहमत नसलेल्या व्यक्ती आणि समाजाला नेस्तनाबूत करण्यात येते.

गांधीजींचे सर्व सिद्धांत अहिंसा, सत्याग्रह, अन्नत्याग, ग्रामस्वराज्य, औद्योगिकरण ई. चा पुर्नविचार होणे आज अपरिहार्य आहे. भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा ज्यांचा थोडाफार परिचय आहे त्यांना हे माहित आहे की हे सर्व विचार गेले २५०० ते ३००० वर्ष भारतीय तत्वज्ञानात प्रवाही आहेत. रामायण आणि महाभारत हे ग्रंथ, 'धर्म' आणि 'अधर्मा'च्या संघर्षाचा इतिहास आहेत. या तत्वज्ञानाच्या 'सांदर्भिक' आणि 'व्यवहार्य' सीमा दाखवणारे ते मार्गदर्शक ग्रंथ आहेत. उपनिषद अनेक 'रुपके' देत जीवनातील अत्यंत 'कूट' सत्यांचे विवेचन करतात. सर्व दर्शने आणि आचार्यांची मते याच वैश्विक सत्याचा उहापोह करतात. ३००० वर्षांच्या या सिद्धांतामागचा दीर्घ इतिहास जेव्हां दृष्टीआड केला जातो तेव्हा हे सर्व सिद्धांत

(मलपृष्ठ ३ वर)

(मुखपृष्ठावरून )

**संपादकीय**

भांडवलशाहीवर आधारीत लोकशाही मध्ये ती थोड्या दीर्घ काळांनी येते एवढेच. एकदा आंधळेपणानी अशा लोकशाहीचे वकीलपत्र घेतले की प्राचीन आणि अैतिहासीक काळामध्ये तावून सुलाखून निघालेल्या व्यवस्थेला 'खलनायक' बनवण्यात अक्कलवंताचे रतीब चालू होतात. भारतामध्ये कमीत कमी २००० वर्षे 'वर्णाश्रम' व्यवस्था अस्तित्वात होती. पण लोकशाही चौकटीत ही व्यवस्था बसत नाही हे गृहीत मान्य केल्यावर अशा सर्व पर्यायी व्यवस्थांना 'मागसलेल्या' आणि 'विषमतेवर' आधारीत सिद्ध करावे लागते.

मानवी अस्तित्व व संस्कृतीचा पट एवढा मोठा आहे की, कुठल्याही सामाजिक, धार्मिक राजकीय संस्थेचा यशापयशाचा विचार हा दशक किंवा शतकापेक्षा सहस्त्रावधी वर्षांच्या पार्श्वभूमीवर करावा लागतो. आज प्रगतीच्या शिखरावर असलेल्या अमेरिका व युरोपातील अर्थ संकट आणि सांस्कृतीक पतन अतिशय बोलके आहे. कारण या पाश्चात्त्य लोकशाहीत समाजाची ऐहिक उन्नती व परिपक्वता ही अंगीभूत आहे, असाही एक आभास निर्माण करून देण्यात येतो. शरीरामध्ये जशी एक रोगप्रतिकारक शक्ती अस्तित्वात असते, तशी प्रतिकारशक्ती या व्यवस्थेत आहे आणि त्यामुळे समाज कधीच अपरिपक्व, असंतुलित, अविवेकी वागणार नाही अशी खात्री देण्यात येते. दुर्दैवाने लंडनमध्ये नुकत्याच झालेल्या दंगली, विशेषत: त्यातील तरुणांचा सहभाग या घटना या सर्व विश्वासाला छेद देणाऱ्या आहेत. याउलट इजिप्तसारख्या एकछत्री, गरीब देशात झालेली निदर्शने ही अपेक्षेबाहेर संतुलित व शांत होती.

या पार्श्वभूमीवर श्री अण्णा हजारेंचे आंदोलन बघावे लागेल. भारतात आज त्याच्या स्वातंत्र्यापासून, म्हणजे ६४ वर्षे लोकशाही आहे. राजकीय पक्ष असोत वा सामाजिक विचारवंत असोत, या वस्तूस्थितीचे आग्रहाने प्रतिपादन करतात. बुधवार, गुरूवार, शुक्रवार दि. १७, १८ आणि १९ ऑगस्टच्या लोकसत्तेतील अग्रलेख त्या मधिल परखडते करता अभिनंदनिय आहेत. अण्णा हजारेंचे आंदोलन व आग्रह हाच मुळी अलोकशाही आहे, हे मत अनेक विचारवंत आग्रहाने मांडतांना दिसतात. आजच्या भारतातील प्रांत आणि केंद्रीय लोकशाहीचे स्वरूप हे 'खऱ्या' लोकशाहीचेच प्रतिबिंब आहे असाच अर्थ यातून निघतो आणि खरी मेख इथेच आहे!

राजेशाही, एकधिकारशाही, घराणेशाही नको म्हणून लोकशाही पाहिजे. लोकशाहीचा मूळ घटक म्हणजे प्रत्येक नागरिक. या नागरिकाने आपला मतदानाचा अधिकार हा त्याच्या सद्सदविवेक बुद्धी, म्हणजे उपलब्ध असलेल्या उमेदवाराचे चरित्र्य, वैचारिक जडणघडण आणि प्रत्यक्ष त्याच्या कार्याचा इतिहास या सर्वांचा संतुलित विचार करून मतदान करणे अपेक्षित असते. लोकशाही म्हटली म्हणजे पक्ष आले आणि लोकशाहीचा आधार असलेले हे पक्षच मुळी पक्षांतर्गत लोकशाही 'दिखाऊ' करतात आणि व्यक्ती, घराणेशाही आणि जातीय कसोट्यांवर ग्रामपंचायतीपासून दिल्ली पर्यंतच्या नेतृत्वाला मान्यता देतात.

भारतातला सर्वांत जुना व मोठा पक्ष म्हणजे काँग्रेस पक्ष. जवाहरलाल नेहरू सोडले तर त्यांच्या पुढील पिढी, अगदी त्यांच्या पणतवंडांपर्यंत ही उच्च शिक्षित तर सोडाच, पण महाविद्यालयाची पदवीही चांगल्या श्रेणीत उत्तीर्ण झाल्याचा इतिहास नाही. कुठल्याही मूलभूत

(पृष्ठ क्र. ३९ वर)

(पृष्ठ क्र. ४० वरून )

**संपादकीय**

‘संदर्भहीन’ होउन जातात. परकीय सत्ता नेस्तनाबूत करण्याकरता ‘राजकीय’ हेतूंनी वापरले गेलेले हे गांधीवादी सिद्धांत जेव्हां स्वकीय सत्तेतीत मतभेद आणि संघर्ष संपवण्या करता वापरले जातात तेव्हां ते अन्यायकारक, जुलमी आणि हास्यास्पद होतात. गांधी विचारांचा गेले ६० वर्षे राजकीय वापर करण्याऱ्या विचारवंतांची ही शोकांतिका आहे. देश विभाजनाच्यावेळी झालेली हत्याकांडे आणि ५५ कोटी पाकिस्तानाला देण्याकरता गांधींनी केलेला सत्याग्रह जेव्हां यशस्वी झाला, तेव्हांच खरं म्हणजे गांधीवादाच ‘थडग’ बांधल गेल. क्रांतीकारकांचा ‘सशस्त्र’ क्रांतीचा पुरस्कार हा ‘परकीय’ सत्ता संपुष्टात आणण्या करता होता. या वस्तुस्थितीचा विपर्यास करून स्वकीयांवर हिंसा करणाऱ्या नक्षलवादांचे समर्थन मात्र जेव्हां हे ‘गांधीवादी’ आणि तथाकथित ‘बुद्धीवादी’ करतात तेव्हा दांभिकता सहन करण्याची सहनशीलता संपलेली असते. स्वा. सावरकरांच्या कवितेतील ओळी पुसून टाकणारे हे पंचमस्तंभी, घराणेशाही पूजक जेव्हा ‘अफझल गुरू’ पूढे गुडघे टेकतात तेव्हा निर्लज्ज पणाची हद्द झालेली असते. व्यक्तीवाद, एकाधिकारशाही आणि आणिबाणीच्या वेळी ‘अनुशासन पर्व’ म्हणून समर्थन करणारे गांधीवादी संत आणि घराणेशाहीच्या खांद्यावर उभे राहून मोठे होऊ पहाणारे बेगडी राजकारणी आणि विचारवंत हेच खरे गांधीवादाचे मारेकरी आहेत.

अण्णांबद्दल कितीही आदर बाळगला आणि हे ‘जन’ आंदोलन आहे म्हणून कितीही आक्रोश केला तरी रस्त्यावरच्या लोकांच्या संख्येने हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणे अयोग्य आहे. अण्णांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरलेले अनेकजण ज्या सरकारी भ्रष्टाचाराचे आपण बळी आहोत म्हणून सांगतात, त्याच सरकारकडे अवास्तव सवलती मागण्यात आग्रहाने पुढे असतात. म्हणून शुद्ध संख्याबळावर लादलेली लोकशाही काय किंवा रस्त्यावरल्या संख्याबळांनी महत्वाचे प्रश्न सोडवण्याचा केलेला प्रयत्न काय, दोघांचेही यश हे ‘धोकादायक’ आणि भविष्यात अराजकतेला आमंत्रण देणारे आहे. बधिर सरकार, राजकारणी आणि रस्त्यावरील ‘जन’ आंदोलनांचा शेवट हा ‘जय’ आणि ‘पराजयात’ नसतो तर ती एका नवीन ऐऊ घातलेल्या ‘अराजकतेची’ सुरूवात असते. अण्णांचा नेतृत्वाचा खरा ‘कस’ हा या आंदोलनाच्या यशापयशा नंतरच लागेल. नाहीतर जयप्रकाश नारायणानंतर त्यांचे दायीत्व सांगणारे ‘मुलायम’ आणि ‘लल्लूच’आपल्याला आधिक संख्येने सहन करावे लागतील. अण्णा हजारेंच्या चळवळींनी भ्रष्टाचारा व्यतिरिक्त अनेक मूलभूत सिद्धांतांना व्यापक चर्चेच्या परिघात आणले हेच या चळवळीचे सर्वात मोठे श्रेय आणि यश आहे.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❇ *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
❇ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
❇ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*
*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❇ संपर्क ❇

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.